अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ०२ मार्च २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १५३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## विधानसभेत राऊतांविरुध्द, विधानपरिषदेत मुख्यमंत्र्यांविरुध्द हक्कभंग ?

## विधिमंडळ नव्हे चोरमंडळ : राऊत

## चहापानाला गैरहजर राहणारे देशद्रोही : शिंदे

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सत्ताधाऱ्यांकडून आयोजित चहापानावर बहिष्कार टाकणारे विरोधक हे देशद्रोही आहेत, असे म्हणणारे मुख्यमंत्र्यांवर महाविकास आघाडीने विधानपरिषदेत हक्कभंग दाखल करण्याच्या हालचाली सुरू करताच विधिमंडळाला चोरमंडळ म्हणणाऱ्या ठाकरे गटाचे प्रवक्ते खा.संजय राऊत यांच्यावर हक्कभंग दाखल करण्याचा विषय भाजपने विधानसभेत पुढे रेटला. त्यावरून विधानसभेत प्रचंड राडा झाल्याने सभागृह तहकूब करावे लागले. यावरून दोन्ही बाजूने जोरदार आरोप-प्रत्यारोप झाले.**

शह दिला की काटशह देणे, वार केला की पलटवार करणे, आरोप झाला की प्रत्यारोप होणे आणि हल्ला केला की प्रतिहल्ला करणे असे कोंडीत पकडले की खिंडीत गाठायचे नाट्य सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात नेहमीच चाललेले असते. या नाट्याचा नवा अंक बुधवारी राज्य विधिमंडळात पाहण्यास मिळाला. विधानपरिषदेत महाविकास आघाडीचे बहुमत असल्याने ठाकरे गट त्याठिकाणी मुख्यमंत्री शिंदेंविरोधात हक्कभंग प्रस्ताव आणणार असल्याचे समजताच शिंदे गट आणि भाजपमध्ये जोरदार हालचाली झाल्या. सभागृहाचे कामकाज सुरू होताच विधानसभेत भाजपने संजय राऊत यांच्या 'चोरमंडळा'चा मुद्दा उपस्थित केला. त्यावरून शिंदे गटाचे आमदार तुटून पडले. सुरुवातीला विरोधीपक्षनेते अजित पवार यांनी यावर मौन धारण केल्यामुळे भाजपवाल्यांचा जोर वाढला. याच मुद्यावरून काही वेळात सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडू लागले. त्यातून सभागृहात एकच गोंधळ उडाला. परिणामी सभापतींनी सभागृह तहकूब केले.

### विधानपरिषदेत महाविकास आघाडीचा डाव

विधानपरिषदेत महाविकास आघाडीचे बहुमत आहे. शिवाय शिवसेना नेत्या नीलम गोरे या विधानपरिषदेच्या उपसभापती आहेत. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या चहापानावर बहिष्कार घालणाऱ्या विरोधकांना देशद्रोही, महाराष्ट्रद्रोही संबोधणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर हक्कभंग दाखल करण्याच्या हालचाली ठाकरे गटातून सुरू झाल्या. साहजिकच महाविकास आघाडीचे बहुमत असल्यामुळे हे शक्य आहे. तसे झाल्यास मुख्यमंत्री अडचणीत येऊ शकतात.

### इथेही उद्‌भवणार पेच

संजय राऊत हे राज्य विधिमंडळाचे सदस्य नसून ते राज्यसभेचे सदस्य आहेत. म्हणून त्यांच्याविरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव आणण्याचा अधिकार हा फक्त राज्यसभेलाच आहे. याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार हा राज्यसभेचे सभापती अर्थात उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सचिवालय यांनाच आहे. म्हणजेच सध्यस्थितीत राज्य विधिमंडळात राऊत यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल करताच येत नाही, असे घटनातज्ञांचे म्हणणे आहे.

### झालीच तर फक्त चौकशी होऊ शकते

राऊत यांच्याबाबतीत फार फार तर राज्य विधिमंडळ चौकशी करू शकते. चौकशीत काही तथ्य आढळल्यास विधानसभा अध्यक्ष हे संपूर्ण प्रकरणच राज्यसभा सभापतींकडे पाठवू शकतात. तिथे पुन्हा या प्रकरणाची चौकशी होऊ शकते. चौकशी अहवाल आल्यानंतरच राज्यसभा सभापती योग्य तो निर्णय घेतात. याठिकाणी संबंधितांना नैसर्गिक न्यायतत्त्वानुसार त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली जाते. ही संपूर्ण प्रक्रिया न्यायिक स्वरूपाची आहे.


### विधानसभेत भाजपचा प्रतिडाव

विधानपरिषदेतील ठाकरे गटाच्या हालचालींची कुणकुण लागताच विधानसभेत भाजपने प्रतिडाव टाकला. ठाकरे गटाचे प्रवक्ते खा. संजय राऊत यांनी विधिमंडळाला चोरमंडळ म्हटले आहे. त्यावरून राऊतांवर हक्कभंग दाखल करण्याची मागणी भाजपकडून आ. आशिष शेलार आणि अतुल भातखळकर यांनी केली. साहजिकच या मागणीवरून विधानसभेत सत्ताधारी आणि विरोधक यांनी गोंधळ घातला.



- आम्ही चार लाख लोकांतून निवडून येतो, त्यामुळे आम्ही चोर नाही : **गुलाबराव पाटील**
- अधिवेशन संपण्याआधी हक्कभंग समितीचा निर्णय जाहीर करावा : **शंभुराज देसाई**
- फक्त दहा मिनिटांसाठी पोलिसांचे संरक्षण काढा, परत उद्या सकाळी ते दिसणार नाहीत : **नितेश राणे**
- हक्कभंगाचा तुम्हाला अधिकार आहे. तुम्ही याबाबत निर्णय घ्यावा : **नाना पटोले**
- आम्ही सत्ताधाऱ्यांच्या चहापानाला गेलो नाही म्हणून राज्याचे मुख्यमंत्री आम्हाला देशद्रोही कसे म्हणू शकतात? : **भास्कर जाधव**
- हक्कभंग आणल्यास त्याला सामोरे जाईन, तुरुंगात गेलोय, हक्कभंगाला घाबरणार नाही : **संजय राऊत**
- विधिमंडळाला चोरमंडळ आहे म्हणण्याचा अधिकार कुणालाही नाही. संजय राऊत हे जर तसे बोलले असतील तर ते चुकीचे आहे : **अजित पवार**
- हा विषय एका पक्षापुरता मर्यादित नाही. विधिमंडळ म्हटल्यानंतर ठाकरे सुद्धा सभागृहाचे सदस्य आहे. मग तेही चोरमंडळाचे सदस्य ठरतात. आम्ही सर्वच चोर मंडळाचे सदस्य ठरतो. राऊतांनी केवळ चोरमंडळ नाही, तर गुंडमंडळ असा शब्दही वापरला आहे. आम्ही काय गुंड आहोत का? : **देवेंद्र फडणवीस**
- राऊतांनी केलेल्या वक्तव्याची पुढील दोन दिवसांत हक्कभंग समितीकडून चौकशी केली जाईल. चौकशी अहवालानुसार ८ मार्च रोजी निर्णय सुनावला जाईल : **राहुल नार्वेकर** (विधानसभा अध्यक्ष)

## सोलापूर शहर-जिल्ह्यात दहावी बोर्ड परीक्षेला आजपासून सुरुवात



**सोलापूर** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावीच्या परीक्षेला उद्या गुरुवारी दोन मार्चपासून मराठी विषयाच्या पेपरने सुरुवात होत आहे. या परीक्षेला सोलापूर शहरासह जिल्ह्यातून १७६ परीक्षा केंद्रामधून ६४ हजार ४२४ विद्यार्थी इयत्ता दहावीची परीक्षा देणार आहेत. शहर आणि जिल्ह्यातल्या सर्व परीक्षा केंद्रावर संपूर्ण तयारी झाली असून विद्यार्थ्यांनी कोणतेही दडपण न घेता परीक्षेला सामोरे जाताना निकोप वातावरणात पेपर सोडवावेत अशी माहिती माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांनी दिली.

राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षा या गुरुवार दि.२ मार्च पासून मराठी विषयाच्या सुरू होतील आणि शनिवार दि.२५ मार्च रोजी समाजशास्त्र भाग -२ या विषयाचे पेपरने परीक्षेची सांगता होईल. प्रत्येक पेपरच्या मध्ये दोन दिवस विद्यार्थ्यांना पुढील विषयाच्या अभ्यासासाठी वेळ देण्यात आला आहे. तर प्रत्येक वर्गात २५ विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे सोलापूर शहरासह जिल्ह्यात दहावीसाठी २० संवेदनशील परीक्षा केंद्र असून या ठिकाणी बैठे पथकासह पोलिसांचा कडक बंदोबस्त राहील. या परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी संपूर्ण जिल्ह्यात कॉपीमुक्त अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी शहर आणि तालुकास्तरावर तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, यांचे फिरते आणि भरारी पथके कार्यरत राहतील. प्रत्येक शाळेत कायमस्वरूपी बैठे पथक असेल, त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना तपासणी करून परीक्षेच्या हॉलमध्ये सोडण्यात येईल. शाळेतील बैठे पथकात चार जणांचा सहभाग असून त्यात एका महिला कर्मचाऱ्यांचाही समावेश असेल. या सर्व पथकांबरोबरच जिल्हाधिकारी यांच्यामार्फत १६ विशेष पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. अशी माहिती ही शिक्षणाधिकारी सुद्धा वटारे यांनी दिली आहे.

**दहावी विद्यार्थ्यांना आता पेपर लिहिण्यासाठी दहा मिनिटांचा वेळ वाढवून मिळणार आहे. बोर्डाने नुकतंच १० मिनिटे आधी प्रश्नपत्रिका देण्याची पद्धत बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र विद्यार्थ्यांना आता पेपर लिहिण्यासाठी निर्धारित वेळेपेक्षा १० मिनिते जास्त वेळ मिळणार आहे.**

## शेत मोजणीसाठी २० हजार लाचेची मागणी करणाऱ्या भूकरमापकास अटक

### दोन दिवसाची पोलीस कोठडी

**सोलापूर** : शेत मोजणीसाठी वीस हजार लाचेची मागणी करणाऱ्या माढ्याच्या भूकरमापकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक करण्यात आली आहे.

प्रशांत भारतराव कांबळे (पद-भुकरमापक,वर्ग-३,भूमी अभिलेख कार्यालय, माढा) असे अटक करण्यात आलेल्या कर्मचाऱ्याचे नाव असून, त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने प्रशांत कांबळे यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.यातील तक्रारदार यांची मौजे रोपळे (क.) येथील गट नं. ५४५ वरील शेत जमिनीची मोजणी झाल्यानंतर ती जमीन मोजणी व हद्द कायमचा नकाशा (क- प्रत) वर उपअधीक्षक यांची सही घेऊन देण्यासाठी म्हणून भूमी अभिलेख कार्यालय, माढा येथील भुकरमापक प्रशांत भारतराव कांबळे हे वीस हजार रुपये लाचेची मागणी करीत असलेबाबत अँन्टी करप्शन ब्यूरो, सोलापूरकडे दि.१० जानेवारी २०२३ रोजी तक्रार प्राप्त झाली होती.या तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता,यातील लोकसेवक प्रशांत कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या शेतजमिनीच्या जमीन मोजणी व हद्द कायमचा नकाशा (क-प्रत) यावर उपअधीक्षक,भूमिअभिलेख कार्यालय माढा यांची सही घेऊन देण्यासाठी वीस हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे.या प्रकरणात लोकसेवक प्रशांत कांबळे यांना ताब्यात घेण्यात आले असून,गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोनि, चंद्रकांत कोळी,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि,सोलापूर पोलीस अंमलदार-पोअं.पकाले,पोअं.किणगी,चालक पोअं. उडाणशिव सर्व नेमणुक ला.प्र.वि,सोलापूर यांनी केली.

## बालिकेवर लैंगिक अत्याचार; आरोपीला ३ वर्षे सक्तमजुरी

सुराज्य/सोलापूर

नऊ वर्षाच्या बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यास विशेष न्यायाधीश व्ही.पी. आव्हाड यांनी ३ वर्ष सक्त मजुरी आणि ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

प्रदीप नागनाथ हुळ्ळे( रा.सोलापूर) असे शिक्षा झालेल्या आरोपींचे नाव आहे. यातील फिर्यादीची मुलगी ही शहरातील एका दुकानात दुधाची पिशवी आणण्याकरिता गेली होती. त्यावेळी आरोपी प्रदीप याने बालीकेस दुकानात बोलवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करीत तिचा विनयभंग केला होता. या प्रकरणी जोडभावी पेठच्या पोलीसांनी आरोपी विरुध्द पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून अटक केली होती.त्यानंतर आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकार तर्फे ६ साक्षीदार तपासण्यात आले.गुन्हा शाबीत झाल्याने न्यायालयाने आरोपीला शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारतर्फे अॅड. शीतल डोके तर आरोपीच्या वतीने अॅड. राम जाधव यांनी काम पाहिले.

## जि.प.चे अधिकारी गुवाहाटी दौऱ्यावर जाणार

सुराज्य/सोलापूर



काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेल, सगळं ओके ! या वाक्यामुळे या आमदार शहाजी बापू पाटील यांच्या डॉयलॉगमुळे चर्चेत आलेल्या गुवाहाटी शहरात आता जि.प.चे अधिकारी दौऱ्यानिमित्त जाणार आहेत.राज्यातील आमदार आणि मंत्र्यांचे दौरे आता गुवाहाटीला वाढले आहेत. त्यातच आता अधिकाऱ्यांना सुद्धा या गुवाहाटी शहरात जाण्याचे संधी. शासनाकडून मिळत आहे.

राज्याचे सरकार गुवाहाटीला गेल्याने स्थापन झाले त्यामुळे ट्रेनिंग केंद्र ही राज्य सरकारने बहुतेक गुवाहाटीला केले असावे की काय अशी चर्चा. जिल्हा परिषदेच्या आवारात होत आहे सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये सध्या अतिरिक्त कारभाराचा भार वाढला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी हे मसुरीला प्रशासकीय ट्रेनिंगसाठी गेल्याने त्यांचा पदभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर सांभाळत आहेत. सध्या मार्च एंड सुरू असल्याने निधी खर्चीसाठी कोहिनकर हे अधिकाऱ्यांना वारंवार सूचना करत आहेत. त्यातच आता तीन महत्वाचे विभाग प्रमुख गुवाहाटीला ट्रेनिंगसाठी जात आहेत. मग झेडपीचे कामकाज मर्चंट मध्ये चालवायचे कसे आहे संशोधनाचा विषय आहे गुवाहाटी दौऱ्यावर जाणारे जिपचे प्रमुख अधिकारी आहेत त्यामध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी इशादीन शेळकंदे, महिला व बालकल्याण विभागाचे कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांचा समावेश आहे. मार्चच्या पुढील आठवड्यात चार दिवसाचे ट्रेनिंग आहे. मार्च एंड असल्याने अधिकाऱ्यांची जाण्याची इच्छा नसली तरी या ट्रेनिंगचे प्रमुख डॉ मल्लिनाथ कलशेट्टी यांनी प्रत्येकांना बंधनकारक केले असल्याचे सांगण्यात येत आहे त्यामुळे नाईलाजास्तव अधिकाऱ्यांना जावं लागत आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सायेब, हा चहा आहे!
पैसे नाही!

कल्याण

567-85-366

## जगदीश पाटील तर एक प्यादे... त्यांचा बोलवता धनी वेगळा

- देवस्थानमध्ये राजकारण नको, भाजून भस्म व्हाल
- अध्यक्ष धर्मराज काडादींचा विरोधकांना इशारा



**सोलापूर** : देवस्थानमध्ये गेली अनेक वर्ष राजकारण घुसले आहे. राजकीय जोडे बाहेर ठेवून देवस्थानाचा कारभार चालू आहे. मात्र काही विनाकारण देवस्थानला बदनाम करण्यासाठी कुटील राजकारण करत आहेत. एक प्यादे पुढे करत नाहक आरोप करत बदनामीचे षडयंत्र चालू आहे. राजकारणासाठी इतर क्षेत्र असताना देवस्थानातील राजकारणाचा खेळ थांबवायला हवे अन्यथा श्रीसिध्देश्वर महाराज अद्याप जिवंत आहेत. जर असेच वागाल तर भाजून जाल, त्याचे चटके बसल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी विरोधकांना दिला.

ग्रामदैवत श्री सिध्देश्वर देवस्थानमध्ये पंच कमिटीच्या कार्यालयात बुधवारी काडादी यांनी पत्रकार परिषद घेऊन माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनी केलेल्या आरोपांचे खंडन केले. पाटील यांचे आरोप खोटे आणि दिशाभूल करणारे असल्याचे सांगितले. पाटील हे एक प्यादे आहेत. त्यांचा बोलविता धनी वेगळाच आहे. असे सांगत अप्रत्यक्ष पणे आमदार विजकुमार देशमुख यांचे नाव न घेता टिका केली.

पाटील आणि काडादी सोलापुरात कोण आहेत, हे सर्वांना माहीत आहे. जगदीश पाटील यांच्याशी माझे गेल्या अनेक वर्षापासून अतिशय जवळचे संबंध होते. परंतु ग्रामदैवत श्री सिध्देश्वर महाराजांच्या यात्रा काळात शोभेच्या दारुकामावेळी नंदिध्वजांना होम मैदानावर यायला उशिरा झाला. त्यावेळी प्रमुख जिल्हा न्यायाधीशांसह इतर अनेक न्यायाधीश व प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. त्यांना किती वेळ ताटकळत थांबवायचे म्हणून आपण दारूकाम सुरू करण्यास सांगितले. त्यादरम्यान, वेदमूर्ती बसवराज शास्त्री यांच्याकडे असलेला माईक कोणालाही न देण्याची सूचना केली होती. मात्र, पाटील यांनी देवस्थानचा हा माइक त्यांच्याकडून स्वत:कडे घेतला. त्यामुळे त्यांच्या या चुकीबाबत आपण त्यांना बोललो असता ते दुखावले गेले. वास्तविक याबाबत त्यांनी आपल्याला नंतर तरी विचारायला हवे होते. परंतु तसे न करता त्यांनी कुणाच्या तरी सांगण्यावरून अर्धवट माहितीच्या आधारे माध्यमांना दिशाभूल करणारी व चुकीची माहिती दिली आहे. तसेच त्यांनी उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे माध्यमातून समजते. याबाबत न्यायालयात आपण योग्य ते उत्तर देऊ असे काडदी म्हणाले. या पत्रकार परिषदेस नीलकंठप्पा कोनापुरे, सिध्देश्वर बमणी, गुरूराज माळगे, अॅड.आर. एस.पाटील, विश्वनाथ लब्बा, गिरीश गोरनळळी, चिदानंद वनारोटे, शिवकुमार पाटील, बाळासाहेब भोगडे, मल्लिकार्जुन कळके, प्रा.डॉ. राजशेखर येळीकर, सुरेश म्हेत्रे आदी उपस्थित होते.

### प्रतिमा खराब करण्याचे काम सुरू

आपले पणजोबा, आजोबा, वडील आणि काकांनी देवस्थानमध्ये मोठे काम केले आहे. सोलापूरच्या विकासासाठी त्यांनी अनेक संस्था काढल्या आणि त्या नावारूपाला आणल्या. सर्वसामान्यांना उपयोग व्हावा या हेतूनेच या संस्थांची स्थापना केली. जे जे चांगले करता येईल ते ते त्यांनी केले. राजकारणाचे जोडे बाजूला ठेवून या संस्थांमध्ये काम सुरू होते. राजकारण घुसले आणि चुकीच्या पद्धतीने दिशाभूल करणारे आरोप करून प्रतिमा खराब करण्याचे काम सुरू असल्याचे काडादी यांनी सांगितले.

### काडादी परिवाराने अधिक सेवा केली

ग्रामदैवत श्री सिध्देश्वर देवस्थानमध्ये काडादी परिवारासह समाजातील अनेक प्रतिष्ठित घराण्यांकडून पूर्वापार सेवा सुरू आहे. परंतु काडादी परिवाराने अधिक सेवा केली आहे. असे असताना देवस्थान कुणाच्या बापाचे नाही, असा मुद्दा उपस्थित करणाऱ्या माजी नगरसेवक जगदीश पाटील यांच्या विधानावरून धर्मराज काडादी हे भावुक होऊन गहिवरल्याचे दिसून आले. तसेच आपल्यालाही इतरांचा बाप काढता येतो, परंतु आपण तसे करणार नाही, असेही काडादी म्हणाले.

### विरोधी भूमिका घेणाऱ्यांविरोधात उमेदवार

यापुढील काळात श्री सिध्देश्वर देवस्थान आणि सिध्देश्वर परिवारविरोधी भूमिका घेणाऱ्यांविरोधात नगरसेवक, आमदार, खासदार आणि अन्य निवडणुकांत सिध्देश्वर परिवाराकडून उमेदवार दिला जाईल, अशी घोषणा श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांनी केली.

### हिरेहब्बूंनी मर्यादेत राहावे

हिरेहब्बू हे श्री सिध्देश्वर यात्रा काळातील केवळ मानकरी व पुजारी आहेत. त्यांनी त्यांच्या मर्यादेतच राहावे, असा इशारा देऊन हिरेहब्बू यांच्याकडे यापूर्वी देणगीरूपाने जमा असलेल्या वस्तू या श्री सिध्देश्वर देवस्थानच्याच आहेत. त्या मागवून घेऊ, असेही धर्मराज काडादी यांनी स्पष्ट केले.

# येड्डींचे श्रेष्ठत्व...

कर्नाटकातील एक मातब्बर,लोकप्रिय व भाजपाचे ज्येष्ठ नेते बी.एस.येडीयुरप्पा यांनी राजकीय जीवनातून निवृत्ती घेतली. जवळ जवळ ४० वर्षे समाजाकारण आणि राजकारण करणारा हा नेता वयाच्या ८० वर्षी अखेर थांबला.जिथे सूर्योदय होते तिथे सूर्यास्त असते.हा सृष्टीचा नियम आहे.माणसाचेही तसेच आहे.आयुष्याच्या संध्याकाळी कुठेतरी थांबायलाच हवे.येड्डींनी सृष्टीचा आदेश मान्य करून बुधवारी विधानभवनात झालेल्या भाषणात कानडी जनतेला अभिवादन केले.वय झाले असले तरी शेवटच्या श्वासापर्यंत भाजपचेच काम करेन,असा दिलासा त्यांनी पक्ष नेतृत्वावाला दिला.कारण येड्डींना त्यात राज्यात मोठा मान आहे.त्यांचा शब्द तिथली जनता प्रमाण मानते.सालस,अभ्यासूपणा आणि लोकांची सेवा यामुळे येड्डी तिथे लोकप्रिय नेता ठरले आहेत. कर्नाटकात लवकरच विधानसभेच्या निवडणुका होणार असल्याने सर्वच राजकीय पक्षांनी मार्चेबांधणीला सुरूवात केली आहे. या निवडणुकीत भाजपला लिंगायत समाजामध्ये लोकप्रियता असलेल्या येडियुरप्पा यांची उणिव भासणार आहे.सन दोन हजारच्या दशकापर्यंत कर्नाटकातील सत्तेचा विचार केला तर काँग्रेस आणि जनता परिवार या दोन पक्षांच्या भत्तेवती सत्तासुंदरी फिरत राहिली.जिथे एकही आमदार



नव्हता अशा कठीण स्थितीत येड्डींनी भाजपची धुरा खांदावर घेतली.काँग्रेस आणि जनता परिवार या दोनही पक्षांमधील नेते वजनदार होते.त्यांची लोकप्रियता प्रचंड होती.त्यांना फाईट करण्याची ताकत कुणामध्ये नव्हती परतु येड्डींनी ती ताकत स्वतःच्या हिमतीवर उभी केली.पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा लवाजामा गोळा केला.घर-दार याचा विचार न करता येड्डी भाजपसाठी पायाला भिंगरी लावून राज्याचा कानाकोपरा पिंजून काढला.आता सर्वच राजकीय पक्ष आपापल्या नेत्यांना जातीचे लेबल लावत आहेत.त्याकाळी म्हणजेच २५ वर्षांपूर्वीचा काळ पाहाता नेत्यांना जात नव्हती.केवळ पक्ष आणि विचार हेच पाहिले जायचे.प्रस्थापित पक्षांची ताकत भेदून काढत येड्डींनी भाजप उभा केला इतकेच नाही तर या पक्षाला सत्ता मिळवून दिली.दक्षिण भारतात कमळ कधीच फुलणार नाही,असे राजकीय निरीक्षक नेहमी म्हणत असत.पण येड्डींनी ती किमया साध्य करून भल्या भल्यांना तोंडात बोटे घालायला लावली.पहिल्या फळीतील नेते माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांचे येड्डी हे अत्यंत विश्वासू.कारण ते समवयस्क होते.संयमी,लोकप्रियता असणाऱ्या नेत्यांना अटलजी जवळ करायचे.म्हणून निवृत्तीच्या भाषणात येड्डींनी अलजींचे स्मरण केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येड्डींपेक्षा बारा वर्षांनी लहान.तरी देखील येड्डींनी मोदींशी जुळवून घेतले.कारण मोदींची लोकप्रियता ही वेगळीच होती. यावेळी त्यांनी भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचे स्मरण केले. शिवमोगा येथे तीन दिवसांपूर्वी विमानतळाच्या उद्घाटनाचा कार्यक्रम मोदींच्या हस्ते झाला. तिथे मात्र येड्डींचे श्रेष्ठत्व उभ्या देशाला पहायला मिळाले. मोदी यांच्या कृपेमुळेच राजकारणात मुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचू शकलो,अशा शब्दात येड्डींनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखवून दिला.याठिकाणी अजून एक मोठेपणा व दिलदारपणाचा प्रसंग घडला.मोदींनी आपल भाषणात येड्डींच्या कारकिर्दीवर प्रकाश टाकलाच शिवाय भाषण संपल्यानंतर मोदींनी येड्डींना वाकून नमस्कार केला.तेव्हा येड्डींना गहिवरून आले होते. एक दोनवेळा नाहीतर सातवेळा त्यांनी भाजपला सत्तेचा मान मिळवून दिला.पक्षातील सत्ता संघर्षाचा त्यांना त्रास सहन करावा लागला. त्यातून त्यांनी नवा पक्षही काढला पण नव्या पक्ष काढणाऱ्यांची काय हालत होते? याचे चटके येड्डींनाही बसले.अखेर त्यांना स्वगृही परतावे लागले.त्यानंतरही त्यांची पक्षात आणि लोकांमध्ये क्रेझ कायम होती. ते पुन्हा मुख्यमंत्री झाले.आपली सत्ता आहे म्हणून भाजप नेते स्वस्थ बसत नाहीत. येडियुरप्पा यांचे कर्नाटकच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान आहे. कर्नाटकमध्ये १७ टक्के लिंगायत समाज आहे. त्यामुळे निवडणूक जिंकायची असेल तर या समाजाची मते फार महत्त्वाची आहेत. येडियुरप्पा यांचे लिंगायत समाजाच चांगले वजन आहे. मात्र त्यांनी निवडणुकीच्या राजकारणातून संन्यास घेतल्यामुळे त्यांची जागा भरून काढणाऱ्या प्रभावी लिंगायत नेत्याचा भाजपाकडून शोध घ्यावा लागणार आहे.येड्डीप्रमाणे अन्य एक प्रभावी नेता भाजपमध्ये आहे,असे वाटत नाही.विद्यमान मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे प्रभाव पाडतील,असे वाटत नाही.जनता दलातून भाजपमध्ये आलेले ते नेते आहेत.येड्डींच्या सांगण्यावरूनच त्यांना मुख्यमंत्रीपद दिले गेले आहे. सध्या कर्नाटकात काँग्रेसने चांगलाच जोर लावला आहे.कुमारस्वामी यांच्याकडूनही रणनीती आखली जात आहे.परत एकदा या दोन पक्षांचे भाजपसमोर तगडे आव्हान असणार आहे.

राजकीय

# सीबीआयच्या रडारवर 'आप'

दिल्लीचे उपमुख्यमंत्री व आम आदमी पक्षाचे (आप)चे नंबर २ नेते मनीष सिसोदिया यांना सीबीआयने अटक केल्यानंतर पक्षाचे सर्वेसर्वा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मोठा धक्का बसला आहे. सिसोदिया आणि पक्षाला वाचवणे हे त्यांचे प्रथम काम आहे. एकीकडे काँग्रेस आणि भाजपला राष्ट्रीय पर्याय म्हणून आपचा विस्तार होत असतानाच सीबीआयच्या रडारवर आपचे नेते आले आहेत. विशेष म्हणजे स्वच्छ प्रतिमा म्हणून गाजावाजा केलेल्या या पक्षाचे डझनभर नेते वेगवेगळ्या घोटाळ्यांत व गैरव्यवहारात गुंतले आहेत. आप बचाव हे अभियान चालविण्याची पाळी केजरीवाल यांच्यावर आली आहे. मनीष सिसोदिया यांच्यासह सत्येंद्र जैन, विजय सिंगला, गीता रावत, जयवंत सिंग, बलबीर सिंग, निशा सिंग, अमानुल्ला खान, युवराज सिंग जडेजा, सोमनाथ भारती, गोपाल इटलिया, ताहिर हुसेन, अशा आपच्या नेत्यांची गंभीर आरोपाखाली चौकशी चालू आहे किंवा त्यांना शिक्षा झाली आहे.

दिल्लीचे उपमुख्यमंत्री सिसोदिया सीबीआयच्या जाळ्यात सापडले आहेत, सीबीआयच्या तावडीतून आपली सुटका व्हावी म्हणून त्यांनी सर्वोच्च न्यायालयाची दारे ठोठावली. आपमध्ये केजरीवाल यांच्यानंतर सिसोदिया हे सर्वात मोठे नेते आहेत. सीबीआयने केलेल्या अटकेनंतर त्यांच्याभोवती संशायाचे वातावरण निर्माण झाले. आप आणि दिल्ली सरकार यामध्ये सिसोदिया यांची नेमकी काय भूमिका होती? सिसोदिया यांना सीबीआयच्या कोठडीत राहावे लागले, तर पक्षावर त्याचा काय परिणाम होईल? सिसोदिया यांच्या पाठीशी पक्ष भक्कम उभा आहे हे जनतेला दाखविण्यासाठी पक्षाला काय करावे लागणार आहे? आम आदमी पक्षात सिसोदिया यांना पर्याय नाही आणि त्यांच्या तोडीचा दुसरा नेता शोधणे हे इतके सोपे नाही. दिल्ली सरकारमध्ये एकूण ३३ खाती (मंत्रालय) आहेत. त्यापैकी १८ खाती सिसोदिया यांच्याकडे आहेत. पण त्यांचा नेहमी उपमुख्यमंत्री किंवा शिक्षणमंत्री एवढाच वारंवार उल्लेख होत असतो. एवढी आणि महत्त्वाची खाती एकाच व्यक्तीकडे आहेत, याची कधी कोणी चर्चा करीत नाही. सिसोदिया यांच्याकडे शिक्षण, नियोजन, अर्थ, जमीन व इमारती, दक्षता, सेवा, पर्यटन, कला व सांस्कृतिक, कामगार, रोजगार, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, उद्योग, पाणीपुरवठा आदी खाती आहेत. केजरीवाल यांचा त्यांच्यावर प्रचंड विश्वास व मोठा भरंवसा आहे, म्हणूनच एवढी भारंभार खाती सिसोदिया यांच्याकडे सोपवली आहेत. एक मंत्री दीड डझन खात्यांना वेळ देऊ शकतो का? एवढ्या खात्यांना न्याय तरी देऊ शकतो का? पण त्याबाबत कोणी प्रश्न विचारत नाहीत. मात्र सिसोदिया यांना मद्य घोटाळा प्रकरणी अटक झाल्यानंतर आपचे कार्यकर्ते सीबीआय विरोधात निदर्शनासाठी रस्त्यावर आणले जात आहेत. एक्कावन्न वर्षांचे मनीष सिसोदिया हे राजकारणात येण्यापूर्वी पत्रकार होते. काही काळ ते आरटीआय कार्यकर्ता म्हणूनही सक्रिय होते. कबीर आणि परिवर्तन ही संस्था ते चालवत होते. अरविंद केजरीवाल यांच्या पब्लिक कॉज रिसर्च फाऊंडेशन या संस्थेचे काम करीत होते. २६ नोव्हेंबर २०१२ रोजी स्थापन झालेल्या आम आदमी पक्षाचे ते कार्यकारिणी सदस्य झाले. २०१३ मध्ये त्यांनी दिल्ली विधानसभा निवडणूक



लढवली व पटपडगंज मतदारसंघातून विजयी झाले. अर्थमंत्री म्हणून दिल्ली सरकारच्या आगामी वर्षाच्या अर्थसंकल्पाची तयारी तेच करीत होते. आप सत्तेवर येण्यापूर्वी दिल्ली सरकारचे बजेट ३० हजार कोटींचे होते, आता ते ७५ हजार कोटींचे झाले आहे. दिल्लीचे अर्थमंत्री सीबीआय कोठडीत राहणार असतील, तर बजेटच्या तयारीवर निश्चित परिणाम होईल.

सरकार व पक्षात सिसोदिया यांच्यावर मोठी जबाबदारी आहे, त्यामुळे त्यांच्या अटकेचा परिणाम दोन्हींवर होण्याची शक्यता आहे. आम आदमी पक्ष व अरविंद केजरीवाल यांच्या इंडिया अगेंस्ट करप्शन या आंदोलनाला हिंदी भाषिक पट्ट्यात भरपूर समर्थन मिळाले. आपची कार्यपद्धतीही हिंदी भाषिकांचा विश्वास संपादन करणारी ठरली. हिंदी भाषिक पट्ट्यात वर्षानुवर्षे भाजपची मक्तेदारी आहे. तेथे भाजपला आव्हान देण्याचे काम आप करीत आहे. या वर्षी मध्य प्रदेश, राजस्थान व छत्तीसगडमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. आपने २०१९ मध्ये या राज्यात आपली केडर उभी करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा विस्तार या वर्षी करण्याचा आपचा प्रयत्न आहे. पण सिसोदिया यांच्या अटकेनंतर त्याला खिळ बसण्याची शक्यता आहे. पंजाबमध्ये मिळालेल्या विजयानंतर अन्य राज्यांत गंभीरपणे निवडणुका लढविण्याचे आपने ठरवले आहे. निवडणुकांचा आराखडा व रणनिती आखण्यात सिसोदिया यांची महत्त्वाची भूमिका आहे.

सिसोदिया यांच्या अटकेनंतर देशात आपची प्रतिमा एक भ्रष्टाचारी व घोटाळेबाजांचा पक्ष अशी होऊ शकते, अण्णा हजारे यांच्या आंदोलनातूनच आपची बीजे पेरली गेली. भ्रष्टाचाराच्या विरोधात लढणारा व स्वच्छ प्रतिमेचा पक्ष असा आपने नेहमीच गवगवा केला. आता मात्र सिसोदियांसह डझनभर नेते केंद्रीय तपास यंत्रणांच्या रडारवर येतात, याचा दुसरा अर्थ काय समजायचा? ज्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत त्याला समर्थन देणे आणि ज्या यंत्रणांनी कारवाई केली त्यांच्या कार्यालयासमोर पक्षाचे आंदोलन करणे यातून देशाला काय संदेश दिला जातो? मोदी सरकार आपच्या नेत्यांवर केवळ आकसाने कारवाई करीत आहे, असे आरोप करून दिल्लीकर जनतेची सहानुभूती मिळवणे एवढेच आपच्या हातात आहे. जनतेची सहानुभूती मिळविण्यासाठी आपने सध्या सोशल मीडियाचा जोरदार वापर सुरू केलेला दिसतो. राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसला देशात १९ ते २० टक्के मतदान होते. आम आदमीला देशपातळीवर काँग्रेसच्या एक चतुर्थांश सुद्धा मते मिळत नाहीत.

त्यामुळेच देशपातळीवर भाजप व काँग्रेसला आम्ही पर्याय आहोत, असे चित्र उभे करणे हे आपला इतके सहज सोपे नाही. दिल्ली व पंजाबमध्ये सत्ता काबीज केल्यानंतर उत्तर प्रदेश किंवा हिमाचल प्रदेशमधील निवडणुकीत आपला आपली जादू दाखवता आली नाही. गुजरातमध्ये आपने हवा निर्माण केली पण भाजपच्या ताकदीपुढे आपला केवळ विधानसभा प्रवेशावरच समाधान मानावे लागले आहे. सिसोदियांची अटक हा मुद्दा भावनिक बनवण्याचा प्रयत्न आपकडून होतो आहे. सीबीआयच्या कार्यालयात चौकशीसाठी जाण्यापूर्वी मनीष सिसोदिया आपल्या मोटारीच्या टपावर उभे राहिले व त्यांनी म्हटले, मी जीवनात नेहमीच इमानदारीने व मेहनत करून काम केले. लोकांनी दिलेल्या प्रेमामुळेच मी दिल्लीच्या उपमुख्यमंत्रीपदावर पोहोचलो. जीवनात मी खूप चढ-उतार पाहिले. मी टीव्ही चॅनेलची नोकरी करीत होतो. तिथे चांगले वेतन होते व बढतीही मिळत होती. पण ते सोडून अरविंद केजरीवाल यांना साथ देण्याचे ठरवले व दिल्लीच्या गरीब वस्तीत, झोपडपट्टीत काम करू लागलो. मी आता जेलमध्ये जाणार आहे, माझी पत्नी घरी आजारी आहे. ती घरात एकटी आहे, तिची तुम्हीच काळजी घ्या. दिल्ली सरकारने मद्य विक्रीविषयक जे धोरण ठरवले त्यात खासगी ठेकेदारांना खूप लाभ झाला, खासगी कंपन्यांसाठी मार्जिन मनी वाढविण्यात आला. त्यात मोठा भ्रष्टाचार झाला, या खेळात अबकारी कर अधिकारी आपणहून सहभागी होते की, त्यांच्यावर दबाव होता, अशा मुद्द्यावर सीबीआय तपास करीत आहे. शिक्षण मंत्री म्हणून दिल्लीतील शाळा अद्ययावत व आधुनिक बनविण्यात सिसोदियांची महत्त्वाची भूमिका होती. शिक्षण क्षेत्रातील पोस्टर बॉय अशी सिसोदियांची प्रतिमा बनली होती. हाच पोस्टर बॉय आज सीबीआयच्या जाळ्यात हात-पाय मारताना दिसतो आहे. दिल्ली सरकारच्या मद्य घोटाळा प्रकरणी सीबीआयने ७ राज्यांत २१ ठिकणी छापे मारून पुरावे गोळा केले आहेत. सीबीआयने सादर केलेल्या आरोपपत्रात सिसोदियांसह अन्य पंधरा आरोपींची नावे आहेत.

**- डॉ.सुकृत खांडेकर**

टुडेज् ब्लॉग

# बोलीभाषा शुद्ध की अशुद्ध?

एका कार्यक्रमात नागराज मंजुळे म्हणाले, 'भाषेत शुद्ध-अशुद्ध असं काही नसतं. ती प्रत्येकाची असते, स्वतंत्र असते.' पण भाषेच्या शुद्धीकरणाबाबत बोलायचं झालं तर प्रत्येक भाषेचं स्वतःचं एक व्याकरण असतं, शब्दकोश असतो, लहेजा असतो, त्यात सरमिसळ झाली की ती अशुद्ध बनतेच. समजा, वैदर्भीय भाषा तुम्ही मालवणी लहेजात बोललात तर ऐकायला कसं वाटेल? किंवा मालवणी भाषेत नागपुरी शब्द वापरले तर मालवणकर पायताणाने हाणनार नाहीत?

मराठी भाषेचं अस्तित्व धोक्यात आलेले असतानाच प्रमाण आणि बोली भाषेवरून प्रचंड वाद होत आहेत. या वादातून शुद्ध आणि अशुद्ध भाषेचा उगम झाला असावा. प्रमाण भाषा शुद्ध आणि बोली भाषा अशुद्ध असं शहरी भागातील उच्चशिक्षितांना वाटतं. मात्र, शुद्ध आणि अशुद्धचं वर्गीकरण असं न करता तांत्रिकपद्धतीने केल्यास प्रमाण आणि बोली भाषांचा आदर राखला जाईल. प्रमाण भाषेचे स्वतंत्र नियम आहेत. ते कालानुरूप बदलत गेल्याने जुन्या व्याकरणानुसार नव्या व्याकरणाच्या नियमांत बरेच बदल जाणवतात. पण, बोली भाषांचं तसं नाही. बोली भाषेबाबत जे नियम भाषेच्या जन्मापासून तयार झाले तेच आजतागायत राहिले आहेत. त्यामुळे बोली भाषा सर्वाधिक शाश्वत आणि जुनी आहे. हे नियमच भाषेतील गोडवा टिकवतात, म्हणूनच कोणतीही भाषा शब्दकोश, लहेजा आणि व्याकरण या अलंकारानेच सजते. परंतु, भाषेचे हे नियम पायदळी तुडवले की त्या भाषेचा आत्माच मरतो. अहिराणी, कोंकणी, मालवणी, नागपुरी, वऱ्हाडी, बेळगावी, कोल्हापुरी, कारवारी या बोली भाषा त्या त्या प्रदेशातच जाऊन ऐकण्यात गोडवा आहे. या भाषा कृत्रिमरित्या शिकल्या तरी त्यांचा लहेजा आपल्यात मुरत नाही. कारण बोली भाषांचे संस्कार मुळातूनच जीभेवर रोवले गेले पाहिजेत. जन्मापासूनच बोली भाषांचे उच्चार आपल्या कानावर पडले गेले पाहिजेत. तरच त्यांचा आस्वाद घेता येतो. पण गेल्या काही वर्षांपासून अनेक बोली भाषा मृतावस्थेत आहेत. कित्येक बोली भाषा लोप पावल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या संवर्धनाची गरज निर्माण झाली आहे.





१९६१ च्या जणगणनेनुसार भारतात १६५२ बोलीभाषा बोलल्या जात होत्या. मात्र द पीपल लिंग्विस्टिक सर्व्हे ऑफ इंडियाने २०१० साली केलेल्या सर्वेक्षणात केवळ ७८० बोली भाषा शिल्लक राहिल्या. तर, याच सर्वेक्षणातून असंही सिद्ध झालं होतं की १९७ भाषांचं अस्तित्व धोक्यात असून ४२ भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. भाषा प्रवाही राहिली नाही तर ती नष्ट होते हे जगजाहीर आहे. त्यामुळे भाषेचा वापर सुरू राहणं गरजेचं आहे. मात्र प्रमाण भाषेचं वाढलेलं वर्चस्व आणि शिक्षणात झालेली क्रांती यांनी बोलीभाषांना नख लावले आहे. आधुनिक जीवनशैलीला सामोरे जाताना आपापल्या बोलीचे स्वत्व व सौंदर्य टिकविण्याची आकांक्षा छोट्या छोट्या समुदायांमध्ये कशी पेरायची, हा खरा प्रश्न आहे. बोली भाषांचं जतन करण्याचं दुसरं साधन म्हणजे साहित्य. आज अनेक बोली भाषांचं केवळ मौखिक साहित्य उपलब्ध आहे. लोकसाहित्य, लोककलांमधून बोली भाषांचा प्रचार-प्रसार होत राहतो. मुळातच प्रत्येक बोलीची एक कला असते. त्यातूनच लोककलांचा उगम होतो. मात्र लोककलांना असलेली मागणी कमी होत गेल्याने बोलीभाषांचाही प्रसार कमी झाला.

मालवणी, कोकणी, अहिराणी, गोंड, भिली, कोरकू या बोलीभाषांचे लिखित साहित्य उपलब्ध आहे. मात्र यापलीकडे देशभरातील स्थानिक बोलीभाषांचे साहित्य उपलब्ध नसल्याने या बोलीभाषा पुढच्या पिढीसाठी जतन करून ठेवणं कठीण होऊन बसलंय. 'भाषा नष्ट होणं ही सांस्कृतिक हानी आहे. भाषा लुप्त होण्यानं दंतकथा, खेळ, संगीत, खाण्यापिण्याच्या पद्धती असं सगळंच रसातळाला जातं,' असं भाषावैज्ञानिक डॉ.गणेश देवी सांगतात. त्यामुळे एक बोली भाषा नष्ट झाल्याने संपूर्ण संस्कृती नष्ट होते हे लक्षात घ्यायला हवे. प्रत्येक बोली रसाळ असल्याने, बोलीची संस्कृती रंजक असल्याने या बोलींचा अभ्यास आता सुरू आहे. लोकसाहित्य, दलित साहित्य, नागरी साहित्यांसोबतच बोलीभाषेतील साहित्य, बोली भाषांचा अभ्यास सध्या सुरू आहे. आगरी, मालवणी, कोकणी, अहिराणी भाषेचा अभ्यास सुरू आहे. यातूनच कोकणी मुस्लिम बोली थेट द. आफ्रिकेतील केपटाऊनमध्ये पोहोचली असल्याचे पुढे आले आहे. मात्र हे काही मोजके अपवाद सोडता अनेक बोली भाषांचा अभ्यास करायचा ठरवला तरी संदर्भ सापडणे कठीण आहे. त्यासाठी शासनस्तरावर ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे. बोली भाषांचे जतन, संवर्धन करण्यासाठी आता जर पावले उचलली नाही तर अस्तित्वात असलेल्या बोली भाषाही संपतील. अनेक भाषावैज्ञानिक, भाषाअभ्यासक बोली भाषा टिकवण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांच्या अभ्यासाला, त्यांच्या संशोधनाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष दिल्यास उरलेल्या भाषा जगवण्यासाठी आणि संस्कृती टिकवण्यासाठी मदत होईल.

**- स्नेहा कोलते**

# जसा भाव तशी देवाची प्राप्ती

प्रपंचात जसा पैसा लागतो त्याप्रमाणे परमार्थात भाव लागतो. प्रपंचात पैशाशिवाय चालूच शकत नाही. परमार्थही भाव असल्याशिवाय होत नाही. जसा तुमचा भाव असेल त्याप्रमाणे तुम्हाला देवाची प्राप्ती होईल. प्रल्हादाला खांबातही देवाची प्राप्ती झाली, तर नामदेवाने दगडाच्या मूर्तीलाही जेऊ घातले. तुम्हा सर्वांना गोपीची गोष्ट माहीत असेलच.

त्या गोपीला श्रीकृष्णाला जेवण घालायचे होते, पण तिचा नवरा तिला जाऊ देईना. त्यावर तिने सांगितले की, हा देह तुझा आहे, परंतु मनावर तुझा ताबा नाही. असे म्हणून ती त्याच्या देहाजवळ देह ठेवून श्रीकृष्णाकडे गेलीच की



नाही? त्याप्रमाणे आपण परमार्थात भाव ठेवणे जरूर आहे, पण असे आपण नुसते म्हणून काय उपयोग? तो सर्वव्यापी आहे, सर्वसाक्षी आहे, असे आपण म्हणतो, पण आपण पापाचरण करायला भीतो का? तो आपल्याला पाहतो आहे असे पक्के वाटले तर आपल्याकडून कधीतरी पाप होईल का? पण आपल्याला तसे वाटतच नाही. आपल्यासारख्या आस्तिकाला देव हवा' असे वाटते खरे, पण हवाच' असे वाटत नाही. आपल्या प्रपंचाच्या मदतीसाठी देव हवा असे वाटते. प्रपंच असावाच' असे आपल्याला वाटते आणि भगवंत मात्र असला तर बरं' असे वाटते. याच्या उलट भगवंत असावाच' आणि प्रपंच असला तर बरा' असे वाटायला पाहिजे. प्रपंचाची आवड असू नये, पण प्रपंचातल्या कर्तव्याची आवड असावी. देहाने ते कर्तव्य करावे आणि मनाने मात्र अनुसंधान ठेवावे. ज्या गोष्टी आपल्या मनाला खातात त्या न केल्या की आपला आपल्या विकारांवर ताबा येईल. भगवंताच्या देखत आपल्याला करायला लाज वाटणार नाही, अशीच कृती आपण करावी.

# जनमानस

## तुर्कीशी संबंधांमध्ये दूरदर्शी विचार

भूतकाळातील राजनैतिक कटुता पूर्णपणे विसरून, भीषण संकटाच्या काळात तुर्कस्तानला मदत करण्यात भारत अग्रगण्य देश ठरल्याने तुर्कस्तानशी भारताचे संबंध भविष्यात नक्कीच सुधारू शकतील, असे वाटते. तुर्कीने सुद्धा ही वस्तुस्थिती मोठ्या भावनेने स्वीकारली आहे. या पार्श्वभूमीवर भारत, तुर्कस्तान आणि रशिया यांच्यात मजबूत जवळीक निर्माण झाल्यामुळे पाकिस्तान जागतिक पटलावर कमालीचा एकटा पडत चालला आहे. भारत आणि तुर्कस्तान यांच्यातील संबंध कोणत्या टोकाला पोहोचू शकतील हे येणारा काळच ठरवू शकेल, तथापि, दूरदर्शी, मुत्सद्दी विचारसरणी डोळ्यासमोर ठेवून भारताने हात पुढे केला आहे हे निश्चित.



**- प्रा. व्ही. व्ही. कोष्टी, शिपूर**

## ठोस कृती आराखड्याचा अभाव

नुकतेच रायपुर येथे संपन्न झालेल्या काँग्रेसच्या महाअधिवेशना मध्ये आगामी निवडणुकीत बलाढ्य सत्ताधारी भाजपशी लढण्यासाठी काँग्रेस ठोस योजना आखेल, अशी अपेक्षा होती, तथापि महासभेतील चर्चा पाहता काँग्रेसची संभ्रमावस्था अजूनही कायम आहे, असे म्हणता येईल. राहुल यांची भारत जोडो यात्रा प्रभाव पाडण्यात यशस्वी ठरली, हे नि:संशय, पण त्याचे मतांमध्ये रूपांतर होईल, याबद्दल काहीही सांगता येणार नाही. शिवाय काँग्रेसला मतांशी जोडण्याची इच्छा नसली तरी या यात्रेतून राहुल यांच्या प्रतिमेचा पक्षाला कितपत निवडणूक लाभ होतो हे निश्चित नसल्याने वस्तुनिष्ठ समस्यांवर आणि मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्यात काँग्रेस असमर्थ आहे, असेच म्हणावे लागेल. काँग्रेसकडे ठोस कृती आराखड्याचा अभाव स्पष्टपणे दिसतो. चिंतन-मनन करूनही काँग्रेसला काही नवीन विचार करता आला नाही आणि आजवर ज्या गोष्टी बोलल्या जात होत्या, त्याच फक्त बोलल्या जात आहेत, असेच म्हणावे लागेल.

**- प्रा. विजय कोष्टी**


# महाद्वीपीय विस्थापन

**या विश्वामध्ये कोणतीही गोष्ट स्थिर नाही. प्रत्येकाला गति प्राप्त आहे. जसे चंद्र पृथ्वीभोवती फिरतो, पृथ्वी स्वत:भोवती फिरते आणि सूर्यही स्वत:भोवती फिरतो. सूर्यमालेतील प्रत्येक ग्रह सूर्याभोवती फिरतच असतो. आकाशातल्या प्रत्येक ग्रहाला, ताऱ्यांना गती आहे. असंच काहीसं पृथ्वीच्या पृष्ठभागाचे आहे. पृथ्वीवरील जमिनीचे भाग अर्थात खंड हेही स्थिर नाहीत. ते एकमेकांपासून दूर जात आहेत. हा सिद्धांत काहीसा पटणारा वाटत नाही. तो खरा आहे.**

सोळाव्या शतकामध्ये सर्वप्रथम अब्राहम ऑर्टेलियस यांनी हा सिद्धांत पहिल्यांदा मांडला होता. परंतु त्यांना भक्कम पुरावे देता आले नाहीत. पृथ्वीवरील सर्व खंड हे आपली जागा सातत्याने बदलत आहेत. किंबहुना ते एकमेकांपासून दूर किंवा जवळ जात आहेत. असं १८८० मध्ये सर्वप्रथम जर्मन शास्त्रज्ञ अल्फ्रेड वेगनर याने जगासमोर मांडले. अन्य बऱ्याच वैज्ञानिक शोधांप्रमाणेच याही शोधाला अथवा सिद्धांताला जागतिक मान्यता मिळाली नाही. त्यामुळे वॅगनरने हा सिद्धांत सिद्ध करण्यासाठी पुरावे गोळा करायला सुरुवात केली. १९१५ मध्ये त्यांनी या विषयावर एक परिपूर्ण पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांचा महाद्वीपीय विस्थापन (कॉन्टिनेन्टल ड्रिफ्ट) हा सिद्धांत व्यवस्थित मांडण्यात आला होता. या सिद्धांतानुसार करोडो वर्षांपूर्वी पृथ्वीवरील आज अस्तित्वात असणारे सर्व सातही खंड एकमेकांना जोडलेले होते. दक्षिण अमेरिकेची पूर्व किनारपट्टी आणि आफ्रिका खंडाची पश्चिम किनारपट्टी जर एकमेकांना जोडून पाहिली तर असे लक्षात येते की हे भूभाग एकेकाळी एकमेकांना जोडलेले असावेत. आज या दोन्ही किनारपट्ट्यांमध्ये अटलांटिक महासागर पसरलेला आहे. याशिवाय वेगनर यांनी असे हे सिद्ध केले की, करोडो वर्षांपूर्वी सापडलेल्या जीवाश्मांचे नमुने जगाच्या विविध ठिकाणी सापडलेल्या नमुन्यांशी मिळतेजुळते होते. जसे ब्राझीलमधील जीवाश्म व पश्चिम आफ्रिकेतील जीवाश्म हे सारखेच आढळून आले. तसेच पूर्व आफ्रिकेतील जीवाश्म व भारतातील जीवाश्म हेही मिळतेजुळते दिसून येत होते. हीच मात्रा करोडो वर्षांपूर्वी नामशेष झालेल्या वनस्पतींनाही लागू पडत होती. काही ठिकाणच्या वातावरणाचा अभ्यास करून तेथील वातावरण एकेकाळी सारखेच असावे, हेही त्यांनी पटवून दिले. यावरून पृथ्वीवरील सर्व खंड एकमेकांना जोडलेले होते हे वेगनर यांनी पुराव्यांच्या आधारे सिद्ध केले. तरीही अनेकांना हे फारसे पटले नाही.

१९५० ते १९६० या दरम्यान नवीन तंत्रज्ञान आधारित चुंबकीय सर्वेक्षण करण्यात आले. त्यात असे सिद्ध होते की, सर्व खंड एकेकाळी एकमेकांना निश्चितच जोडलेले असावेत. या सर्वेक्षणातून प्लेट टेक्टॉनिक नावाचा नवा सिद्धांत जन्माला आला. ज्यात असे मांडण्यात आले की, पृथ्वीचे भूभाग अर्थात प्लेट नैसर्गिकरित्या सरकत आहेत. सर्वात वरच्या प्लेटला लिथोस्पियर तर त्याखालील ज्वालामुखीच्या प्लेटला आस्थेनोस्पियर असे म्हटले जाते. ज्वालामुखीच्या सातत्याने होणाऱ्या हालचालीमुळे पृथ्वीच्या भूभागावरील प्लेट सरकत आहेत.

एकेकाळी हे सर्व खंड सलग भूभागावर होते. त्यास पॅन्जिया असे म्हणतात. ही तीस कोटी वर्षांपूर्वीची स्थिती होती. सतरा कोटी वर्षांपूर्वी त्याचे लॉरेशिया व गोंडवानालँड असे दोन भाग व्हायला सुरुवात झाली. आशिया, युरोप व उत्तर अमेरिका हे उत्तरेकडील लॉरेशियामध्ये तर दक्षिण अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, अंटार्क्टिका आणि भारतीय उपखंड हे गोंडवानालँड भागांमध्ये होते. पाच करोड वर्षांपूर्वी भारतीय उपखंडाची प्लेट आशिया खंडाला जोडली गेली. ज्यामुळे आज हिमालयाची निर्मिती झाल्याचे दिसते. आजही भारतीय उपखंड सातत्याने आशिया खंडावर दाब देत आहे





त्यामुळे हिमालयाची उंची काही इंचांनी वाढत चालली आहे. विशेष म्हणजे शास्त्रज्ञांनी हेही सिद्ध केले आहे की, अमेरिका व आफ्रिका खंडांतील अंतर दरवर्षी अडीच सेंटिमीटरने वाढत चालले आहे! आणखी काही लाख वर्षांमध्ये पृथ्वीचा आजचा नकाशा आणि त्यावेळेसचा नकाशा हा पूर्णपणे वेगळा असेल, हे मात्र निश्चित.

**- तुषार कुटे**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## नित्योपासना लघुग्रंथाचे प्रकाशन

**सोलापूर** : श्री दत्तगुरूंना प्रिय असलेल्या स्तुतिस्तोत्रांचा संग्रह म्हणजेच नित्योपासना. दत्तगुरूंची कृपा प्राप्त करण्याकरिता दत्त सांप्रदायात प्रचलित असलेल्या स्तुती आणि स्तोत्रांचे संकलन दत्त गवई ज्ञानेश्वर माउली वाघमारे यांनी केले. दैनंदिन उपासनेत दत्तभक्तांना हे स्तोत्र एकत्रित उपलब्ध व्हावेत म्हणून 'नित्योपासना' या लघुग्रंथामध्ये सर्व स्तोत्रांचा समावेश केलेला आहे. रविवारी सायंकाळी पाच वाजता पत्रकार भवन, विजापूर रोड येथे सोलापुरातील मान्यवर दत्तभक्तांच्या आणि गुरुवर्यांच्या उपस्थितीत या लघुग्रंथाचे प्रकाशन पार पडले. प्रास्ताविकात दत्तगवई ज्ञानेश्वर माउली वाघमारे म्हणाले, 'दत्त महाराज ही स्मृतगामी देवता आहे. अल्पशा सेवेने दत्त महाराज प्रसन्न होतात. कलियुगामध्ये श्रीपाद श्रीवल्लभ अर्थात दत्त महाराजांचेच अधिष्ठान असल्याने दत्तगुरूंची केलेली सेवा त्वरित फळाला येते. दत्त महाराज हे गायन प्रिय आहेत. दत्त महाराज हे संगीतप्रिय आहेत, म्हणून गायनाच्या माध्यमातून केलेली कोणतीही सेवा त्यांच्यापर्यंत रुजू होतेच.' या प्रकाशन सोहळयास स्वामिभक्त डॉ. प्रदीप कार्यकर्ते, सुरश्री कार्यकर्ते (संगीत विशारद), गुरुवर्य प. पू. मिना राघवेंद्राचार्य जोशी गुरुमाई, सोलापूर जिल्हा पत्रकार संघाचे सरचिटणीस पुरुषोत्तम कुलकर्णी, तसेच व्हिजन परिवाराचे राज दुर्जेकर, मंगेश धोरण, राहुल शिंदे, ॲड. नितीन स्वामी, सुनीता पाटील उपस्थित होते.

## लोधी समाज सिम्बॉलचे आ. राजासिंह यांच्या हस्ते प्रक़ाशन

**सोलापूर** : लोधी समाज नवयुवक जागृती संघाच्यावतीने बनविण्यात आलेल्या लोधी समाज एकता सिम्बॉल प्रकाशन लोधी समाजाचे आमदार टी. राजासिंह ठाकूर यांच्या हस्ते करण्यता आले आहे. लोधी समाज नवयुवक जागृती संघ सामुदायिक विवाह संपर्क कार्यालय बेडरपूल येथे थाटात पार पडले. यावेळी मार्गदर्शनात लोधी समाजाची आर्थिक, शैक्षणिक उन्नतीसाठी नवयुवक जागृती संघ करत असलेल्या उपक्रमाबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला व लोधी समाजातील युवकांना सामुदायिक विवाहमध्ये जास्तीत जास्त लोकांनी विवाह करण्याचे आवाहन केले.तत्पूर्वी लोधी समाज नवयुवक जागृती संघाचे अध्यक्ष नागनाथ शिवसिंगवाले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला व लोधी समाजाची आराध्य विरांगणा राणी आवंतीबाई लोधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

## बत्तुल विद्यालयात मराठी भाषा दिन साजरा

**सोलापूर** : आदर्शमाता व्यंकम्माबाई बत्तुल माध्यमिक विद्यालयात २७ फेब्रुवारी मराठी भाषा दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रमोद बत्तुल हे अध्यक्ष म्हणून लाभले होते. यावेळी सर्वप्रथम कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शन तसेच भित्ती पत्रकांचे प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मराठी दिनानिमित्त विद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करुन मराठी भाषेचे महत्त्व सांगितले.

## भिमसेना व्यायामशाळा टिपरी संघ पदाधिकाऱ्यांची निवड

**सोलापूर** : भिमसेना व्यायामशाळा टिपरी संघाच्या उत्सव अध्यक्षपदी प्रशांत साबळे यांची एकमताने निवड करण्यात आली. पुढील पदाधिकारी खालीलप्रमाणे, उपाध्यक्ष - प्रमोद कांबळे, गणेश वाघमारे, खजिनदार - शिवा नागमोडे, अनिरुद्ध लोखंडे, सचिव - तेजस माने, सनी शिंदे व यांच्या प्रमुख उपस्थितीत एन. के. क्षीरसागर, दिलीप फडतरे, चांगदेव रणदिवे, जगू चव्हाण, हिरामणी रोकडे, निलेश सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते व तसेच मंडळाचे आधारस्तंभ अभिजीत वाघमारे, संस्थापक रोहित नागमोडे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले.

## विवेकानंद स्कूलमध्ये मराठीचा जागर

**सोलापूर** : विवेकानंद पब्लिक स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शाळेच्या संचालिका संगीता सारडा उपस्थित होत्या. त्याचबरोबर मुख्याध्यापिका सपना आसावा, सांस्कृतिक विभागप्रमुख अंकिता सारडा, इंदू कुमार, परीक्षा विभागप्रमुख मनाली शहा आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेतील 'स्टार ऑफ दि मन्थ' पुरस्कार विजेत्या विद्यार्थ्यांनी प्रमुख मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर इ. ३ री व ४ थी तील विद्यार्थ्यांनी आपल्या सुरेल आवाजात स्वागतगीत सादर केले. वरद चिपडे (इ. ३री) याने प्रास्ताविक केले.

## दक्षिण सोलापूर तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**सोलापूर** : श्री पंचलिंग शिक्षण प्रसारक मंडळ आहेरवाडी संचलित मल्लप्पा कोनापुरे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय आहेरवाडी येथे दक्षिण सोलापूर तालुका क्रीडा शिक्षक असो.तर्फे बक्षीस वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे कराटे असो. जनरल सेक्रेटरी भीमराव बाळगी यांनी भूषविले. तसेच विद्येची देवता श्री सरस्वती मातेचे प्रतिमेचे पूजन मनोज काळे व सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर दक्षिण सोलापूर पंचायत समिती शिक्षण विभाग व क्रीडा शिक्षक असो. यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २०२२-२३ कबड्डी, खो-खो, हॉलिबॉल व क्रिकेट स्पर्धेतील विजयी व उपविजयी संघाला ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.या कार्यक्रमास द. सोलापूर तालुका क्रीडा असो. चे अध्यक्ष जी. आर. तुप्पद, सचिव विरेश थळगे, सर्व पदाधिकारी प्रमुख पाहुणे भीमराव बाळगी, मनोज काळे, द. सोलापूर तालुक्यातील विविध शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक पर्यवेक्षक, क्रीडा प्रमुख, क्रीडा शिक्षक व विजयी, उपविजयी झालेल्या संघातील खेळाडू व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनी व विद्यार्थी उपस्थित होते.प्रास्ताविक जी. आर. तुप्पद यांनी केले. सूत्रसंचालन आर. एस. चिंचोळी यांनी केले व उपस्थितांचे आभार क्रीडाविभाग प्रमुख व्ही. आर. गावडे यांनी मानले.

# पालेभाज्या उत्पादक 'कंगाल' तर व्यापारी 'मालामाल'

## शेतकऱ्यांचे उत्पादनाचे नियोजन चुकत नसून, विक्री व्यवस्थेत दोष

**सुराज्य/सोलापूर**

**जिवनावश्यक सेवा-वस्तूंच्या महागाईने राज्यभरातील जनता त्रस्त असून अशा महागाईच्या जमान्यात भाजीपाला मात्र कमालीचा स्वस्त विकला जात असून ग्राहकांना मात्र तो चढ्या दराने मिळत आहे. तर कांदा काढून तो बाजारात नेऊन विकणे परवडत नसल्याने शेतकऱ्यांनी त्यात रोटर फिरविलेली बातमी ताजी असतानाच पालेभाज्यांचे दर पडल्याने पालेभाज्या उत्पादक शेतकरी कंगाल होत असून व्यापारी मालामाल होत असल्याचे चित्र सध्या सर्वत्र दिसत आहे.**



कोथिंबिरीच्या जुडीला एक रुपया भाव मिळत असल्याने संतप्त शेतकरी रस्त्यावरून जाणाऱ्या ग्राहकांना कोथिंबीर फुकट वाटून आपला रोष व्यक्त करीत आहेत.भाजीपाल्याचे दर पडल्यावर शेतकरी जेव्हा त्यात रोटर फिरवितो, जनावरे सोडतो किंवा रस्त्याच्या कडेला फेकून देतो, त्या वेळी त्यास सल्ले देणारे अनेक जण पुढे येतात.

वास्तविक पाहता या सल्ले देणाऱ्यांचा प्रत्यक्ष शेतीशी कधी, काहीही संबंध आलेला नसतो. शेतकऱ्यांनी भाजीपाला लागवडीचे नियोजन करायला हवे, ही भाजी लावायला नको, ती भाजी लावायला नको, शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना भाजीपाला विकण्यापेक्षा थेट ग्राहकांना विक्री करायला पाहिजेत, फेकून देण्यापेक्षा भाजीपाला बाजारात नेऊन विकला तर दोन पैसे मिळतात, असे ते सल्ले असतात.

असे सल्ले देणाऱ्यांसाठी काही बाबी स्पष्ट करणे गरजेचे आहे. भाजीपाला काढणी, प्रतवारी तसेच वाहतूक करून बाजारात आणणे, ही कामे खर्चीक तर आहेतच.परंतु त्याही पुढील बाब म्हणजे व्यापारी ठरवून भाजीपाल्याचे दर पाडतात, एवढेच नाहीतर अनेक बाजारात कुप्रथांद्वारे लूट करून उलटी पट्टी शेतकऱ्यांच्या हाती टेकवतात. त्यामुळे अनेक वेळा शेतकरी भाजीपाला बाजारात नेऊन विकण्यापेक्षा फेकून देतात. शेतकऱ्यांकडून रस्त्यावर फेकून देण्यात येत असलेला टोमॅटो शहरात २० ते २५ रुपये किलोने विकला जातो. असे विरोधाभासाचे चित्र भाजीपाल्याबाबत अनेकदा पाहायला मिळते.

हा दोष दूर करण्याचा प्रयत्न शासन-प्रशासनाकडून होत नाही, ही बाब उत्पादकांच्या दृष्टीने दुर्दैवी आहे. शहरांना लागून असलेल्या ज्या काही शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना भाजीपाला विक्री करणे शक्य आहे, असे शेतकरी थेट विक्री करीत आहेत.

त्यातही त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय. शहरांपासून दूरच्या बहुतांश शेतकऱ्यांना असे करणे शक्य नाही. त्यामुळे त्यांना भाजीपाला जवळच्या बाजार समितीत नेऊन नाही तर गावात व्यापाऱ्यांना विकावा लागतो. शेतीमालाच्या बाबतीत दरात चढ-उतार चालूच असतात. परंतु नाशिवंत भाजीपाल्याचे दर खूपच अनिश्चित असतात. वर्षभराचा विचार केला, तर फार कमी कालावधीसाठी भाजीपाल्याचे दर चढे असतात.उर्वरित बहुतांश वेळा ते कमीच असतात. अनेकदा व्यापारी ठरवून भाजीपाल्याचे दर पाडतात, त्या वेळी बाजार समिती प्रशासन काय करते, हाच खरा प्रश्न आहे.भाजीपाल्याचा उत्पादन खर्चाचा त्यांना अंदाज येत नसेल तर पीक अन् हंगामनिहाय उत्पादन खर्च ठरविण्यासाठी प्रत्येक बाजार समितीने वेगळी कमिटी स्थापन करायला हवी. या कमिटीने व्यापाऱ्यांच्या दबावाला बळी न पडता उत्पादन खर्चानुसार भाजीपाल्यास दर मिळेल हे पाहावे.नाशिवंत भाजीपाल्यासाठी क्लस्टरनिहाय काढणीनंतर शीत साठवणुकीच्या सोयीदेखील राज्य शासनाने उपलब्ध करायला हव्यात.त्याला जोडूनच प्रक्रिया उद्योग उभे राहिले, तर भाजीपाल्याची मागणी वाढून दर चांगले मिळतील. विशेष म्हणजे बाजारात एकदमच भाजीपाल्याची आवक वाढून दर पडणार नाहीत.

### गटाराकडेला बसूनच भाजीपाला विकण्याची वेळ

- विक्रीसाठी मंडईत आल्यानंतर जागा शोधण्याचा प्रयत्न केला की आमची ती जागा आहे, दुसरीकडे बसा असे त्यांना सुनावले जाते. जागेसाठी व्यापारी संकुलात तर शेतकऱ्यांना जागाच नाही.
- त्यामुळे गटाराकडेला,रस्त्यावर जागा मिळेल तेथेच शेतमाल विकत बसायचे. दुर्गंधी येणाऱ्या जागेतच शेतकऱ्याला कष्टाने फुलवलेली भाजी विकण्याची वेळ जगाचा पोशिंदा मानल्या जाणाऱ्या शेतकऱ्यांवर येऊनही त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे.
- शेतकऱ्यांकडून एक रुपयाला घेतलेल्या कोथिंबिरीच्या जुडीच्या चार जुड्या करून व्यापारी प्रति जुडी पाच ते दहा रुपयांना शहरी ग्राहकांना विकतात.
- पालेभाज्या,कांदा असो की टोमॅटो यांच्या सरासरी उत्पादनखर्चाचा अंदाज बाजार समितीला असतो. अशा वेळी या उत्पादन खर्चाच्या वरच दर शेतकऱ्यांना मिळतील, हे बाजार समिती प्रशासनाने पाहायला हवे.

# सोलापुरात शनिवारी डॉ. आंबेडकर फेस्टिव्हल

## भीमपुत्र टेक्सास गायकवाड यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजन

**सुराज्य/सोलापूर**

राष्ट्रमाता रमाई भीमराव आंबेडकर शतकोत्तर महोत्सव जयंतीनिमित्त प्रबुद्ध रंगभूमी सोलापूर आयोजित व भीमपुत्र टेक्सास गायकवाड अमृत महोत्सव गौरव समितीच्या वतीने शनिवार दि. ४ मार्च रोजी दुपारी ४.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेस्टिवलचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अखिल भारतीय प्रबुद्ध नाट्य परिषदेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे संयोजक डॉ. कीर्तीपाल गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

भारतीय प्रबुद्ध सांस्कृतिक चळवळीचे प्रवर्तक व ऐतिहासिक धम्मपुत्र देहू रोडचे विकास प्रणेते भीमपुत्र टेक्सास गायकवाड यांच्या पाच दशकातील भीम कार्याचा सन्मान सोलापूरच्या क्रांतीभूमीत व फत्तेसिंह राजे भोसले सातारा यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अंबादास शिंदे हे राहणार आहेत.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक रतनलाल सोनिग्रा (पुणे), मिलिंद कांबळे गुरुजी (कर्नाटक), प्रकाश पगारे, कामगार ज्येष्ठ नेते सुमेध जाधव, मुंबई अखिल भारतीय भीमशाहीर परिषदेचे अध्यक्ष भीमशाहीर हिरापुत्र भवार आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

डॉ. आंबेडकर फेस्टिवलमध्ये भंते नागा प्रकाश नागपूर व भंते केशव यांचे डॉ. बाबासाहेबांच्या विचारावर संकल्पनेतील प्रबुद्ध भारत या विषयावर धम्म प्रवचन होणार आहे. त्याचबरोबर प्राध्यापक विजयकुमार झुंबळे यांचे पाली भाषेवर व्याख्यान होणार आहे. रमाई काव्यगीत गायन हा विशेष कार्यक्रम भीमशाहीर हिरापुत्र पवार सादर करणार आहेत.

भीम गीतांचा झंजावात या कार्यक्रमात कुमारी मानसी सरवदे व प्राध्यापक जीवन शिंदे, पंकज शिंदे, प्रा. शंकर खडसुळे हे सहभागी होणार आहेत. मै फातिमा बोल रही हू हे हिंदी प्रबुद्ध नाट्य प्राध्यापक प्रियंका सावंत या सादर करणार आहेत. याचवेळी मी रमाई आंबेडकर बोलते हा एकपात्री नाट्यप्रयोग देखील सादर होणार आहे. या फेस्टिवलमध्ये डॉ. कीर्तीपाल गायकवाड लिखित एकच स्वप्न प्रबुद्ध भारत. प्रबुद्ध नाट्य भीमशाहीर हिरापुत्र लिखित रमाच्या काळजाचं झालं पाणी हा कार्यक्रम कल्याण श्रावती लिखित आधी कल्याण मध्य कल्याण अंत कल्याण हा वैचारिक ग्रंथ डॉक्टर धम्मपाल माशाळकर लिखित छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रे पत्रे व रामजी गायकवाड लिखित काजवा हा कार्यक्रम प्रकाशित होणार आहे.

या पत्रकार परिषदेस भीमपुत्र टेक्सास गायकवाड अमृत महोत्सव गौरव समितीचे अध्यक्ष मिलिंद प्रक्षाळे स्वागताध्यक्ष डॉ. धम्मपाल माशाळकर कोषाध्यक्ष फारुख शेख उपाध्यक्ष अक्षय बलवा सरचिटणीस रामजी गायकवाड श्रीकांत बनसोडे सांस्कृतिक प्रमुख प्रियांका सीता सावंत उपस्थित होते.



# मुस्लीम समाजातील १७ जोडप्यांचा झाला निकाह

**सुराज्य/सोलापूर**

व्हिवटर युथ फेडरेशनच्यावतीने गेल्या १७ वर्षापासून मुस्लीम समाजाचे सामुदायिक विवाहचे आयोजन करत आहेत, आतापर्यंत चारशे पेक्षा जास्त लग्न करण्यात आले आहे, यंदा ही १७ जोडप्याचे निकाह २८ रोजी अचिवर्स हॉल नं. १ व २ येथे मोठ्या भाटाने संपन्न झाले.

शहर काजी मुफ्ती अमजद अली काझीनी निकाह लावले. गवाह आणि वकिलची जबाबदारी शकिल बागबान, हाजी सत्तार नदाफ यांनी पार पाडली. नव वधु - वरानी - कुबूल किया ... काबुल किया ... कबूल किया उस को और उस के महर को ....! म्हणून एकमेकांशी वैवाहिक नाते जोडून घेतले. यावेळी शहरातील प्रतिशिष्ट नागरीकांसह, समाजीक, राजकिय, शक्षणिक क्षेत्रातील लोकांनी उपस्थित राहून वधु - वरास शुभेच्छा दिल्या.संस्थेचे अध्यक्ष बख्तीयार सय्यद यांनी संस्थेची वाटचालबदल माहिती सांगितली. सचिव इस्माईल डी. के., कादर तांबोळी, हाजी सतार नदाफ, जाकिर शेख, शकील बागबान, रियाज शहाजी, अय्यूब नल्लामंदू यांनी प्रमुख पाहुण्याचा बुके देऊन सत्कार केला.

या सामूदायिक विवाह यशस्वीपणे पार पाडण्यास अय्यूब नल्लामंदू, जावीद काजी, साजीद शेख, जाकिर शेख, रियाज शहाजी, सलीम मुजावर, मुबीन सय्यद, कय्यूम शेख, मकसूद शेख, अबुबकर मोहोळकर, सईद कोसगी, इम्तीयाज कमिशनर, इब्राहीम सालार, मैनोद्दीन शेख अप्सरा, युसूफ पापा कुरेशी, शोएब चौधरी, जावीद बागबान, सलीम जमखंडी, युनुस उस्ताद, मुजम्मील तांबोळी, मुस्तकीम कुरेशी, नसीम शेख, सलीम शेख यांचा सह शेकडों सामाजिक कार्यकर्त्यांनी खुप मेहनत घेतली. या वेळी संस्थेच्यावतीने सर्व वधु वरास कपडे, संसारउपयोगी वस्तु भेट म्हणून देण्यात आले.

## महिला दिनानिमित्त कार्यक्रम

**सुराज्य/सोलापूर**

पलक झलक एजंट या संस्थेतर्फे यंदाच्या वर्षी सोलापूर शहर परिसरात महिला वर्गांसाठी विविध सामाजिक सांस्कृतिक उपक्रम राबविणारे फलक झलक इव्हेंटस असून याही वर्षी खास महिलांसाठी नवा उपक्रम हाती घेण्यात आल्याची माहिती इव्हेंट्सच्या राजश्री दीपक कुडाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महिला दिनाच्या निमित्ताने सलग तीन दिवस महिला उत्सव चालणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन एका



किन्नरच्या हस्ते होणार आहे सोलापुरातील महिलांसाठी खुशखबर म्हणून महिला दिन असेल खास पलक झलक इव्हेंटस प्रेझेंटस तर्फे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी प्रथमच भव्य प्रदर्शन व विक्री सोहळा साजरा करण्यात येणार आहे. शुक्रवार दिनांक ३ रोजी ते रविवार दिनांक ५ पर्यंत सकाळी दहा ते रात्री ९ पर्यंत हे खुले राहणार आहे. स्थळ श्री अटल माहेश्वरी भवन लक्ष्मी नारायण मंदिर सोलापूर सोलापूर या ठिकाणी सदर इव्हेंट्स फलक झलक चा कार्यक्रम होणार आहे.

# सहकार महर्षि कारखान्याच्या १० लाख २१ हजार १२१ व्या साखर पोत्याचे पूजन

**सुराज्य/अकलूज**

अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते - पाटील सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२२ २०२३ च्या गळीत हंगामात उत्पादित झालेल्या १० लाख २१ हजार १२१ व्या साखर पोत्याचे पूजन माजी उपमुख्यमंत्री तथा मार्गदर्शक संचालक विजयसिंह मोहिते - पाटील यांचे शुभहस्ते झाले.

तसेच बगॅसवर आधारीत ३३ मे.वॅट क्षमतेच्या सहवीज निर्मिती प्रकल्पामधून आत्तापर्यंत एक्स्पोर्ट (विक्री) केलेल्या ५ कोटी १५ लाख वीज विक्री युनिटचे पूजन कारखान्याचे संचालक नामदेव ठवरे यांचे हस्ते संपन्न झाले.



कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते - पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह मोहिते - पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतिपथावर वाटचाल करीत आहे. कारखान्याचा सिझन २०२२-२०२३ चा ऊस गळीत हंगाम दिनांक २४ ऑक्टोबर २०२२ रोजी सुरू झाला असून दि .२८ फेब्रुवारी २०२३ अखेर १० लाख ४४ हजार १७७ मे.टन उसाचे गाळप होऊन १० लाख २३ हजार ७५० क्विंटल साखर पोत्याचे उत्पादन झालेले असून बी - हेवी सोडून सरासरी साखर उतारा ० ९ .८६ % व आजचा साखर उतारा १०.२० % आहे . तसेच को - जन प्रकल्पामध्ये दि . २४ ऑक्टोबर २०२१ पासून ८ कोटी ५० लाख ७४ हजार १०४ युनिट वीज निर्माण होऊन ५ कोटी १५ लाख ६८ हजार ६४१ युनिट बीज एक्स्पोर्ट (विक्री) केलेली आहे. चालू सिझनमध्ये उपपदार्थ प्रकल्पातील डिस्टीलरीमध्ये दि . २८/०२/२०२३ अखेर बी हेवी पासून रेक्टीफाईड स्पिरिट १ कोटी ३१ लाख ६२ हजार ७२६ लीटर्स तसेच इथेनॉल उत्पादन १ कोटी १८ लाख ४३ हजार ६३७ लीटर्स झाले आहे.

ॲसेटिक ॲसिडमध्ये ७८७.९०० मे . टन ॲसिटाल्डीहाईड व ३४७.५०० मे . टन ॲसिटीक ॲसिडची निर्मिती झाली आहे अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी दिली.

या कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन प्रकाशराव पाटील, संचालक लक्ष्मण शिंदे, सुरेश पाटील, धनंजय चव्हाण, शंकरराव माने - देशमुख , विजय माने देशमुख, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, राजेंद्र मोहिते, महादेव घाडगे, चांगदेव घोगरे, भिमराव काळे, सतीश शेंडगे, संचालिका श्रीमती कमल जोरवर तसेच माजी व्हाईस चेअरमन रामचंद्र सावंत पाटील, सुरेश मेहेर, माजी संचालक रामचंद्र चव्हाण, सुभाष पताळे , भिमराव काळे, दत्तात्रय शिर्के , मोहनराव लोंढे, नानासाहेब मुंडफणे, पांडूरंग कदम, सुनील एकतपुरे इतर मान्यवर धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, नामदेव चव्हाण, नितीन निंबाळकर, अमरसिंह माने - देशमुख उपस्थित होते.

**नगर परिषद कार्यालय परंडा**
**जि.उस्मानाबाद**
एस.टी.स्टॅन्ड रोड, पिनकोड - ४१३५०२
दूरध्वनी क्रमांक.०२४७७-२३२०३८, फॅक्स क्रमांक.०२४७७-२३२०३३
Email ID - comcparanda@gmail.com

जा.क्र.नप/२०२२-२०२३/८८४ दि.०१/०३/२०२३

**परंडा नगरपरिषद, जि.उस्मानाबाद**
**खुली ई-निविदा सूचना**
**सन २०२२-२०२३**

मुख्याधिकारी, परंडा नगरपरिषद, जि.उस्मानाबाद हे खालील कामाच्या ई-निविदा अनुभवी मक्तेदार, अर्हताप्राप्त तांत्रिक सेवा पुरवठादार यांचेकडून ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ |
| १ | परंडा नगरपरिषदेकडे उपलब्ध असलेल्या सर्व कागदपत्रांचे शासकीय नियमानुसार वर्गीकरण, विविध आकारातील महत्त्वाच्या अभिलेखाचे स्कॅनिंग व डिझीटायझेशन करून सूचीबद्ध पद्धतीने संगणकिकरण करणेविषयी निविदापत्रक. | ०२/०३/२०२३ | ०९/०३/२०२३ |
| २ | विशेष रस्ता निधीतून विविध विकास कामे करणेबाबत | ०३/०३/२०२३ | १०/०३/२०२३ |
| ३ | जलशुद्धीकरण केंद्राचे (खासापुरी रस्ता/परंडा रस्ता) येथील दुरूस्ती करणेबाबत | ०३/०३/२०२३ | १०/०३/२०२३ |

सदर कामाची संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदेद्वारेच ऑनलाईन पद्धतीने होईल. सदर निविदेसंदर्भातील निविदा सूचना प्रसिद्धी, आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धिपत्रक इत्यादी माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असेल.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**परंडा नगरपरिषद**

CMYK


# अक्कलकोट महामार्गावर नाही एकही बसस्थानक

**▶▶ राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने दुजाभाव केल्याचा आरोप**

**▶▶ प्रवासी व शाळकरी मुलांमध्ये तीव्र संताप**

✔ सुराज्य/अक्कलकोट

सोलापूर अक्कलकोट महामार्गावर राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या दुजाभावामुळे वळसंग सह एकही बसस्थानक बांधण्यात आलेले नाही. प्रवासी व शाळकरी मुलांना उन्हातान्हात ताटकळत उभे राहावे लागत आहे.त्यामुळे जनसामान्यांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) महामार्ग क्रमांक ३६१ वरील बसस्थानक फलक परिसरात ताटकळत उभे असलेले शाळेकरी विद्यार्थी व प्रवासी.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर उभारण्यात आलेल्या बसस्थानकांचा फोटो वळसंग(ता.दक्षिण सोलापूर) येथील नागरिकांनी सादर करून प्राधिकरणाने या महामार्गावरही बसस्थानके त्वरित उभारण्याची मागणी केली आहे.रंगभवन,पाणीटाकी (शांती चौक),मल्लिकार्जुन नगर,कुंभारी,तोगराळी लिंबिंचिच ळोळी,वळसंग,कर्जाळ,कोन्हाळी याठिकाणी प्रवाशांना बसची वाट पाहत उन्हातान्हात ताटकळत उभे राहावे लागत आहे.या महामार्गावर कोठेही अधिकृत बसथांब्याचा फलकही दिसून येत नाही.त्यामुळे नवीन वाहन चालक गोंधळात पडत आहेत.

गगनबावडा, रत्नागिरी, गडहिंग्लज, कणकवली, बोरवली अशा अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या अक्कलकोटला येतात.या एसटी गाड्यांचे चालक वाहक या मार्गावर प्रथमच आले तर गोंधळून जातात.त्यांना प्रवाशांच्या मदतीनेच अक्कलकोट गाठावे लागते. खाजगी वाहनधारकांना ही स्थानिक लोकांच्या मदती शिवाय स्वामी समर्थ मंदिरापर्यंत पोहचता येत नाही.त्यामुळे जागोजागी गावाच्या नावाचे फलक, अचुक योग्य दिशादर्शक फलक, वाहतुकींच्या सुचनांचे फलक लावणे अत्यावश्यक आहे. काही ठिकाणी विविध गावच्या दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत पण ते ही चुकींचे पध्दतीने लावण्यात आल्याने प्रवासी गोंधळून जात आहे.

इतर महामार्गाप्रमाणे याही मार्गावर पुर्वी प्रमाणे बसस्थानके बांधणे अंत्यत गरजेचे आहे अन्यथा रस्त्याच्या कडेला बसची वाट पाहत उभे असलेल्या लोकांचा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

देशभरातील कानाकोपऱ्यातून भाविक दर्शनासाठी अक्कलकोट ला येत असतात त्यांना अचूकपणे श्री स्वामी समर्थ मंदिर व स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात येण्यासाठी महामार्गावर दिशादर्शक फलकांची नितांत आवश्यकता आहे.अनेकदा भाविक चुकून चपळगावकडे जात आहेत.

**-अमोलराजे भोसले** (प्रमुख कार्यकारी विश्वस्त, स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ,अक्कलकोट)

---

दहा हजार लोकसंख्येचे गाव,२० ते २५ आजूबाजूच्या गावातील प्रवासी यांची नेहमी वर्दळ वळसंग येथे असते त्यामुळे सर्व सुविधानीयुक्त असे बसस्थानक होणे गरजेचे आहे.

**-जगदीश अंटद**

(माजी ग्रामपंचायत सदस्य व प्रवासी वळसंग)





## टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबईतर्फे गायक मोहंम्मद अयाज यांचा सन्मान

✔ **सोलापूर** : नुकतेच मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटल टाटा मेमोरियल सेंटर तर्फे सोलापूर सुरमणी मोहंम्मद अयाज यांचा सन्मान करण्यात आला. टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या ८२ व्या वार्षिक स्नेहसंमेलन षण्मुखानंद सभागृह मुंबई येथे पार पडला. संगीतकार रामशंकर प्रस्तुत सांस्कृतिक कार्यक्रमात मोहम्मद अयाज यांनी सहभाग दर्शविला. मराठी हिंदी गाणी सादर करून टाटा मेमोरियल हॉस्पिटल व टाटा मेमोरियल सेंटर च्या सर्व परिवारातील रसिकांची मने जिंकली . यावेळी उपस्थित प्रसिद्ध संगीतकार गायक रामशंकर व टाटा मेमोरियल हॉस्पिटल चे ट्रस्टी च्या हस्ते मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमात संगीतकार दिलीप सेन , सारेगम विजेते इशिता विश्वकर्मा , आदित्य शंकर (संगीतकार) स्नेहा शंकर ( एशिया सिंगींग सुपर स्टार) ज्ञानेश्वरी गाडगे ( सारेगमप लिटिल चंम्पस ) अथर्व बक्शी ( सारेगमप लिटिल चंमप ) राशी जोहरी ( अभीनेत्री ) चैताली ( जी मराठी फेम ) गायक जयकुमार दिवाना, आरिफ खान सह अनेक मान्यवर उपस्थित होते टाटा मेमोरियल हॉस्पिटल नी जे मला मान सन्मान दिला.

## कै.नानासाहेब धर्माधिकारी जन्मशताब्दी निमित्त पंढरपुरात महास्वच्छता अभियान

✔ **पंढरपूर** : पंढरपूर येथे महाराष्ट्र भूषण कै. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या वतीने महास्वच्छता अभियान संपन्न झाले. यावेळी पंढरपूर तालुक्यातील १७०० स्वयंसेवकांच्या माध्यमातून ९० टनाच्या पेक्षा जास्त कचरा गोळा करून कचरा डेपो मध्ये पाठवण्यात आला. यासाठी नगरपरिषद पंढरपूर कडून २० घंटागाडी , २ टिप्पर, २ कंटेनर, २ जेसीबी तसेच स्वयंसेवकांकडून २२ ट्रॅक्टर, ३ छोटा हत्ती यांच्या माध्यमातून सर्व कचरा गोळा केला गेला. यासाठी नगरपरिषद पंढरपूरचे मुख्याधिकारी अरविंद माळी, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, आरोग्य अधिकारी नागनाथ तोडकर यांचे विशेष सहकार्य मिळाले. तसेच पंढरपूर विभागाचे उपाधीक्षक विक्रम कदम, शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अरुण फुगे यांनीही सहकार्य केले.

## डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे मोहोळमध्ये पन्नास टन कचरा गोळा

✔ **मोहोळ** : मोहोळ शहरात डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानने स्वच्छता मोहीम राबवत साडेआठशे जणांनी पन्नास टन कचरा गोळा करून त्या कचऱ्याची विल्हेवाट लावली. डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठाण रेवदंडा यांच्या वतीने व महाराष्ट्र भूषण डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्तीनिमित्त मोहोळ शहरात दिनांक १ मार्च २०२३ रोजी सकाळी ७ वा. स्वच्छता अभियान राविण्यात आले. स्वच्छता अभियाची सुरवात मोहोळ नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. योगेश डोके यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मुर्तीला पुष्पहार घालुन स्वच्छता अभियानस सुरवात केली. त्यामध्ये मोहोळ शहरातील शासकिय कार्यालय व परिसराची स्वच्छता करण्यात आली यामध्ये तहसील कार्यालय पोलीस स्टेशन, भुमी अभिलेख कार्यालय सेतू कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नगरपरिषद कार्यालय, पशु वैदयकिय दवाखाना, कोर्ट, शासकिय विश्राम गृह, सार्वजनिक बांधकाम कार्यालय, ग्रामिण रुग्णालय, पोस्ट ऑफिस इ. ठिकाणी स्वच्छता करून सदरचा परिसर स्वच्छ करण्यात आला या स्वच्छता अभियानामध्ये प्रतिष्ठाणच्या ८५० सदस्यांनी सहभाग नोंदवुन सुमारे ५० टन कचरा गोळा करून मोहोळ शहरातील सर्व शासकीय कार्यालयाची स्वच्छता करण्यात आली.



## कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे : चाकोते

✔ **सोलापूर** : कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांचे कार्य दीपस्तंभाप्रमाणे आहे असे प्रतिपादन श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष सिध्दाराम चाकोते यांनी केले. कुमठे येथील श्री सिध्देश्वर शाळेत कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांची ३१वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली याप्रसंगी सिध्दाराम चाकोते बोलत होते. या कार्यक्रमास कामगार युनियनचे जनरल सेक्रेटरी अशोक बिराजदार. प्रशालेचे प्रभारी मुख्याद्यापक कल्लप्पा गुरव. पूर्व प्राथमिक मुख्याद्यापिका जगदेवी बिराजदार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रशालेचे सहशिक्षिका वैशाली माळी यांची हस्तलिखित प्रेरणा या वार्षिक अंकाचे प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देऊन गौरव सन्मान करण्यात आला. कामगार युनियनचे जनरल सेक्रेटरी अशोक बिराजदार यांनी अप्पासाहेबांच्या जीवनातील अनुभव कथन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आरती गायकवाड यांनी केले तर शेवटी आभार अर्चना पवार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अमोद सकोजी. महासिध्द मेसे. पंचप्पा बिराजदार. विठ्ठल मुटाळे. सुप्रिया वडियर आदींनी परिश्रम घेतले.

## उघडेवाडी ग्रामपंचायतीच्यावतीने ६० जणांची नेत्र तपासणी

**१२ रुग्णांची भिंगरोपणाची शस्त्रक्रिया होणार**

✔ सुराज्य/वेळापूर

उघडेवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने एच.व्ही.देसाई नेत्र रुग्णालय महमंदवाडी हडपसर,पुणे यांच्या मार्फत डोळे तपासणी व मोतीबिंदू भिंगरोपण बिनटाक्याचे ऑपरेशन शिबीर ग्रामपंचायत कार्यालया समोर संपन्न झाले.



यामध्ये ६० गरजू व गरीब रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली असून १२ रुग्णांचे मोतीबिंदू भिंगरोपण बिनटाक्याचे ऑपरेशन मोफत केले जाणार आहे. सदर महागडे ऑपरेशन मोफत केले जाणार असल्यामुळे याचा फायदा गोरगरिब रुग्णाना होणार आहे. तसेच ३५ रूग्णांना अल्प दरामध्ये चष्मे उपलब्ध करून देण्यात आले.

या शिबिराचे उदघाट्न श्रीराम दूध डेअरीचे चेअरमन तानाजी जगदाळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रा.डॉ.धनंजय साठे व सामाजिक कार्यकर्ते मोहन कचरे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी उघडेवाडी सरपंच जिजाबाई तानाजी गवळी, उपसरपंच सिमाली धनंजय साठे, जेष्ठ नागरिक सयाप्पा कोळेकर, चांगदेव साठे, ज्ञानेश्वर भगत, सुभाष कोळेकर, जगनाथ गोडसे, विजय साठे, संजय साठे, महेश साठे, जगनाथ भोसले आदिसह जेष्ठ नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

शिबीर संपन्न करण्यासाठी डॉ.रमेश केंगार, डॉ.शिंदे, ग्रामपंचायत कर्मचारी सदाभाऊ साठे व अतुल उबाळे यांनी परिश्रम घेतले.

सदर शिबीर आयोजित केल्याने गोरगरिब व गरजू रुग्णाना याचा फायदा झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करून ग्रामपंचायत उघडेवाडी यांचे आभार मानले.

## देवीहल्लाळी येथे उद्यापासून अखंड हरिनाम सप्ताह

✔ सुराज्य/सोलापूर

श्री संत तुकाराम महाराज कल्याणकारी संस्था आयोजित जगद्‌गुरू संत तुकाराम महाराज बीजोत्सवानिमित्त शुक्रवार दि.३ मार्च ते ९ मार्च दरम्यान निलंगा तालुक्यातील श्री क्षेत्र देवी हल्लाळी येथे अखंड हरिनाम सप्ताह व सामूहिक तुकाराम गाथा पारायण होणार आहे.

शुक्रवारी सकाळी सात वाजात कलश पूजनाने या धार्मिक कार्यक्रमाचा शुभारंभ होणार आहे.त्यानंतर मान्यवराच्या उपस्थितीत वीणा,ग्रंथ, श्रींच्या प्रतिमेचे पूजन,दीप प्रज्वलन व ध्वजारोहणही होईल.या सप्ताहात दररोज पहाटे ४ ते ६ पर्यंत काकडा आरती,श्रींना अभिषेक,७ ते १२ पर्यंत गाथा पारायण,दुपारी १ते २ महाप्रसाद,२ ते ५ पर्यंत महिला मंडळांचे भजन,सायंकाळी ५ ते ६ प्रवचन,६ ते ७ हरिपाठ,रात्री ८ ते १० कीर्तन होईल. त्यानंतर तुकाराम महाराज भजनी मंडळ देवी हल्लाळी व पंचक्रोशीतील भजनी मंडळाचे हरिजागर होईल. गुरूवारी ९ मार्चला या धार्मिक कार्यक्रमांची सांगता होईल.बीजेच्या महाप्रसादाचे ३३ वे मानकरी कोमलबाई मारूती बिरादार ह्या आहेत. तरी भाविकांनी या श्रवणाचा लाभ घ्यावा,असे आवाहन संयोजक ह.भ.प.काशीनाथ सर्जे यांनी केले आहे.

## वीरशैव कक्कय्या संघातर्फे रविवारी मान्यवरांचा सत्कार

✔ **सोलापूर** : वीरशैव कक्कय्या ढोर समाज ज्येष्ठ नागरीक एकता संघ व स्वामी समर्थ महिला बचत योजना यांच्या वतीने रविवार दि.५ मार्च रोजी सकाळी १०-३० वाजता भवानी पेठेतील ढोर गल्लीतील समाज मंदिरात डॉक्टर्स,वकिल,पत्रकार,लेखक, कवी सैनिक,माजी सैनिक खेळाडू व अधिकारी अशा १३५ मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार आहे. सोलापूरचे ज्येष्ठ कवी मारूती कटकधोंड यांच्या हस्ते व ज्येष्ठ साहित्यिक डॉ.अर्जून व्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होईल. सार्वजनिक बांधकाम विभागाचे सेवा निवृत्त कार्यकारी अभियंता मधुकर कटकधोंड, गंगाधर सोनवणे, तुकाराम कोकणे, आबाजी शिंदे, विजय कटके, विनोद व्हटकर, शंकर इंगळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.संस्थेच्या प्रथम वर्षपूर्तीनिमित्त हा कार्यक्रम ठेवण्यात आला असून समाजबांधवांनी उपस्थित रहावे,असे आवाहन संस्थापक अध्यक्ष धोंडिबा नारायणकर व प्रसिद्धी प्रमुख महंकाळेश्वर शिंदे यांनी केले आहे.



## ग्रामीण भागातील मुलांची बौद्धिक क्षमता चांगली : डॉ. शिवपुजे

✔ सुराज्य/नातेपुते

विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असताना खूप अडचणी येतात. एस. एन. डी. करिअर अॅकॅडमीमुळे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणे सोपे होणार आहे. ग्रामीण भागातील मुलांची बौद्धिक क्षमता चांगली असते परंतु योग्य वेळी योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने बौद्धिक क्षमता असूनही विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होत नाही असे मत अकलूज उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांनी व्यक्त केले.

ते नातेपुते येथील एस.एन.डी. इंटरनॅशनल स्कूलच्या दुसऱ्या वार्षिक स्नेहसंमेलन व एस एन डी करिअर अॅकॅडमीच्या येण्यात आलेल्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी डॉ. बसवराज शिवपुजे व प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते नगरपंचायतच्या नगराध्यक्षा उत्कर्षारांनी पलंगे यांच्या हस्ते एस. एन. डी. करिअर अॅकॅडमीचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, स्कूलचे चेअरमन तथा उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, व्हॉ. चेअरमन तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे सचिव रोहित शेटे, विश्वस्त अतुल बावकर, श्रुतिकादेवी देशमुख, डॉ.एम.पी. मोरे, माळशिरस पं.स. सदस्य माऊली पाटील, तात्यासाहेब देशमुख, नगरसेवक ॲड. भानुदास राऊत, पुण्याचे उपजिल्हाधिकारी हरीश सूळ, सेवानिवृत्त डीवायएसपी संजय पलंगे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाहुबली चंकेश्वरा, नगरसेवक रणजीत पांढरे, दिपाली देशमुख माया उराडे, संगिता काळे, सुरेंद्र सोरटे, माजी सरपंच अमरशील देशमुख, ॲड.डी. एन. काळे, महेश शेटे, आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदिप जाधव यांनी केले तर स्कूलचे मुख्याध्यापक संदीप पानसरे यांनी आभार मानले.

## जल जीवनच्या कामासाठी शेंडीचिंच ग्रामस्थ उपोषणाच्या तयारीत

✔ सुराज्य/वेळापूर

शेंडिचिंच पाणीपुरवठा जल जीवन मिशन योजनेचे काम त्वरित सुरू करावे अन्यथा शेंडीचिंच ग्रामस्थ उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती माळशिरस कार्यालयासमोर उपोषण करतील असा इशारा शेंडीचिंच ग्रामस्थ यांनी उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती माळशिरस यांना देण्यात आलेल्या निवेदनात इशारा दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शेंडीचिंच तालुका माळशिरस येथील जल जीवन मिशन योजनेचे अंतर्गत वाडी वस्ती पाईपलाईनचे काम प्रस्तावीत असुन हे काम पुर्ण झाल्यानंतर वाडी वस्त्यानसाठी पाणी पुरवठा सुरु होणार आहे. परंतु सदर पाईप लाईन काम गेली दोन महिन्यापासुन बंद आहे. सदर पाईप लाईन काम पूर्ण झाल्याशिवाय वाड्या वस्तीवरील ग्रामस्थांना पाणी मिळणार नाही तरी तात्काळ सदर काम पूर्ण करण्याबाबत संबंधित ठेकेदारास आदेश व्हावा, ग्रामस्थांना पाणी मिळावे जर वाड्या वस्तीवरील ग्रामस्थांना वेळेत पाणी मिळाले नाही तर शेंडिचिंच येथील ग्रामस्थ जोपर्यंत पाईपलाईन काम पूर्ण करून पाणी सुरू होत नाही तोपर्यंत उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती माळशिरस कार्यालयासमोर बसणार आहेत याची नोंद घ्यावी असा इशारा निवेदनात शेंडिचिंच ग्रामस्थांनी दिला आहे.

# 'घर बंदूक बिरयानी'चा दिमाखदार म्युझिक लाँच सोहळा

**नात्याची ओढ आजही सोलापूरकडे खेचते : मंगेश कुलकर्णी**

✔ सुराज्य/सोलापूर

झी स्टुडिओज् आणि आटपाट निर्मिती नागराज मंजुळे प्रस्तुत 'घर बंदूक बिरयानी' (आशेच्या भांगेची नशा भारी) हा मराठी चित्रपट येत्या ७ एप्रिल रोजी सर्वत्र प्रदशित होत आहे.मंगळवारी पुण्यातील सिटी प्राईड मल्टिप्लेक्समध्ये मोठ्या जल्लोषात साँग लाँचिंग करण्यात आले.गुन गुन'ला प्रचंड प्रतिसाद मिळाल्यानंतर आता 'घर बंदूक बिरयानी'तील आणखी एक गाणं झळकले आहे.नुकताच 'घर बंदूक बिरयानी'चा भव्य म्युझिक लाँच दिमाखदार सोहळा पार पडला.यावेळी दिग्दर्शक हेमंत जंगल अवताडे,नागराज पोपटराव मंजुळे,सयाजी शिंदे आकाश ठोसर,सायली पाटील,संगीतकार ए.व्ही.प्रफुल्लचंद्र,गीतकार वैभव देशमुख,झी स्टुडिओजचे मंगेश कुलकर्णी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



आहा हेरो' या गाण्याच्या प्रदर्शनासोबतच घर बंदूक बिरयानी'चे मेकिंगही या वेळी दाखवण्यात आले.या म्युझिक लाँच सोहळ्यात आहा हेरो' या गाण्यावर गाण्यातील कलाकार,ए.व्ही.प्रफुल्लचंद्र यांनी ठेका धरला.या सोहळ्याला मुंबई-पुण्याबरोबरच राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेले माध्यम प्रतिनिधी व पत्रकार उपस्थित होते.'आ हा हेरो' साँग लाँचचा सोहळा पार पडल्यावर कलाकारांनी चित्रपटासंदर्भात आलेले काही अविस्मरणीय प्रसंग माध्यम प्रतिनिधींशी कथन केले. कलाकारांनी मनसोक्त गप्पा मारल्या,मात्र चित्रपटाचा मुख्य विषय चित्रपटाचा ट्रेलर पाहिल्यावर प्रेक्षकांपुढे येईल.'घर बंदूक बिरयानी' वर मराठी सिनेरसिक भरभरून प्रेम करतील,असा विश्वास अनेकांनी यावेळी व्यक्त केला. 'घर बंदूक बिरयानी' हे टायटल साँग बॉलिवूडचे प्रसिद्ध गायक मोहित चौहान यांनी गायले आहे.गणेश आचार्य यांचे नृत्य दिग्दर्शन लाभलेले हे जबरदस्त गाणे सयाजी शिंदे आणि आकाश ठोसर यांच्यावर चित्रीत करण्यात आले आहे.

निर्माते नागराज पोपटराव मंजुळे म्हणतात,आहा हेरो हे गाणं माझ्यासाठी खूप खास आहे.ए.व्ही.प्रफुल्लचंद्रचे या चित्रपटाला संगीत लाभले आहे. त्यामुळे ही गाणी संगीतप्रेमींना नक्कीच आवडणार,हा विश्वास मला पहिल्या दिवसापासून आहे.या चित्रपटाच्या पोस्टरमध्ये ए.व्ही प्रफुल्लचंद्र म्युझिकल,असे का लिहिले आहे,हे प्रेक्षकांना ७ एप्रिलनंतर कळणार आहे.

झी स्टुडिओजचे व्यवसाय प्रमुख मंगेश कुलकर्णी म्हणतात,बिरयानीमध्ये सगळे जिन्नस असतात आणि त्याची प्रत्येकाची एक खासियत असते,जी बिरयानीला अधिक चविष्ट बनवतात. मुळात नागराज मंजुळे यांच्या प्रत्येक चित्रपटातील गाणी ही खासच असतात.तशीच घर बंदूक बिरयानी'तीलही आहेत.

### नात्याची ओढ सोलापूरकडे खेचते : कुलकर्णी

या सोहळ्यात झी स्टुडिओज् चे प्रमुख मंगेश कुलकर्णी यांनी,त्यांचं माध्यमिक शिक्षण मॉडर्न हायस्कूल,महाविद्यालयीन शिक्षण संगमेश्वर महाविद्यालयात झाल्याचं सांगताना,नात्याची ओढ आजही सोलापूरकडे खेचते,अशा शब्दात त्यांचं सोलापूरशी असलेली नाळ प्रारंभी मांडली.त्यानंतर नागराज मंजुळे,हेमंत आवताडे,संगीतकार ए.व्ही प्रफुलचंद्र आणि झी स्टुडिओज् यांची 'घर बंदुक बिरयानी' लॉकडाऊनच्या पूर्वीपासून सुरु होती.ती आता पूर्णत्वास आली असून, ओटीटी प्लॅटफॉमबरोबर ७ एप्रिल रोजी राज्यातील ३५० हून अधिक चित्रपटगृहात रसिकाच्या भेटीला येत असल्याचे सांगितले.

## निधन वृत्त

### जगन्नाथ जोकार



✔ **सोलापूर** : माढा तालुक्यातील मानेगाव (थोरले) येथील जगन्नाथ वसंत जोकार (वय ५६) यांचे निधन. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली असा परिवार आहे.

### सत्यवान साळुंखे




✔ **माळीनगर** : येथील दि मॉडेल विविधांगी प्रशालेतील शिक्षक सत्यवान विठ्ठल साळुंखे (वय ५३) यांचे बुधवारी (ता.१) पहाटे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सून असा परिवार आहे. बावडा (ता.इंदापूर) येथे पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेत सेवेत असलेल्या सुमन साळुंखे यांचे ते पती होत.

# चेन्नई-सुरत महामार्गाच्या वाढीव मोबदल्यासाठी शीतल म्हेत्रे मैदानात

## शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्या; अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशारा

सुराज्य/अक्कलकोट

**जोपर्यंत तालुक्यातील शेतक-यांना योग्य मोबदला मिळत नाही तोपर्यंत काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून या सरकारच्या विरोधात वेगवेगळया पध्दतीने आंदोलन करुन शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यास भाग पाडू, असा इशारा अक्कलकोट तालुका महिला काँग्रेस अध्यक्षा शितल म्हेत्रे यांनी दिला आहे.**



सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड हा राष्ट्रीय महामार्ग होत आहे यात अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी, नागनहळळी, मातनहळळी, कोन्हाळी, सिन्नूर, बोरगाव, चप्पळगाववाडी, हसापूर, दहिटणे, चप्पळगाव, डोंबरजवळगे, सिंदखेड यासह अनेक गावातून हा राष्ट्रीय महामार्ग जात आहे. यासाठी या गावातील शेतकऱ्यांचे शेत अधिग्रहण करण्यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना नोटीस पाठविण्यात आली आहे. यात कोरडवाहू शेतकऱ्यांना एकरी ३ लाख तर बागायतदार शेतकऱ्यांना एकरी ५ लाख रुपये इतके मोबदला देणार असल्याचे कळविले आहे.

अशा प्रकारची नोटीस पाठवून तालुक्यातील शेतक-यांची एकप्रकारे क्रूर चेष्टा शासन करीत आहे. याबाबत काँग्रेस पक्षाकडून आवाज उठवत तहसील कार्यालयावर जाऊन तहसिलदार बाळासाहेब सिरसट यांना लेखी निवेदन देऊन समृध्द महामार्गा प्रमाणेच याही शेतकऱ्यांना मोबदला देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. शेतक-यांच्या हितासाठी काम करणारे सरकार आहे म्हणून दिंडोरा पिटणारे याप्रकरणी मूग गिळून गप्प का बसले अशा फसव्या सरकारला त्यांची जागा दाखविल्याशिवाय शेतकरी स्वस्थ बसणार नाही.

यावेळी माजी विरोधी पक्षनेते अशपाक बळोरगी शहर अध्यक्ष बसवराज अळळोळी, विधानसभा अध्यक्ष बाबासाहेब पाटील, युवक शहर अध्यक्ष मुबारक कोरबू, रामचंद्र समाणे, मैनोद्दीन कोरबू, शबाब शेख, शाकीर पटेल, अरुण जाधव, सर्फराज शेख, अलिबाशा अत्तार, वसंत देढे, आयाज चंदनवाले, नितेश राठोड, विकी कोरे, विकास मोरे, सद्दाम शेरीकर यासह अक्कलकोट शहर व तालुक्यातील शेतकरी वर्ग मोठया प्रमाणात उपस्थित होते.



## नीरा-देवघरच्या पाण्यासाठी संवाद दौऱ्याची सुरूवात

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील कायम दुष्काळी भागासाठी निरा-देवघर धरणाचे पाणी मिळण्यासाठी संघर्ष ,लढा उभा करणारे जलनायक शिवराज पुकळे ऊर्फ भाऊसाहेब यांनी माळशिरस तालुक्यातील कायम दुष्काळी २२ गावांच्या पाणीप्रश्नांसाठीचा लढा उभा केला. कोथळे, कारुंडे, गिरवी, पिंपरी, लोणंद,कन्हेर, इस्लामपूर, फडतरी, लोंढे -मोहीतेवाडी, भांब, रेडे, मांडकी, जळभावी, गोरडवाडी, मोटेवाडी, तरंगफळ, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी ही २२ गावे दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. त्यापैकी कारुंडे, गिरवी, पिंपरी, लोणंद, कन्हेर, इस्लामपूर, रेडे, मांडकी, गोरडवाडी, मोटेवाडी या गावांना निरा देवघर प्रकल्प मधून पाणी मिळण्याच्या कामाला गती मिळून निधी मंजूर झाला आहे.उर्वरित कोथळे, फडतरी, लोंढे -मोहीतेवाडी, भांब, जळभावी, तरंगफळ, गारवाड, मगरवाडी, पठाणवस्ती, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या गावांना पाणी मिळण्यासाठी संघर्ष चालूच ठेवण्यासाठी, १२ गावातील लोकांसमवेत विचार विनिमय करून आंदोलनाची पुढील दिशा ठरवण्यासाठी संवाद दौऱ्याची सुरुवात सुळेवाडी गावातून केली आहे यामध्ये निरा-देवघर प्रकल्पाविषयी सखोल माहिती देण्यात आली तसेच प्रकल्पाविषयी प्रश्नोत्तरे संवाद दौऱ्याच्या माध्यमातून झाली त्यामुळे लोकांमधून जनजागृती होऊन निरा-देवघर चे पाणी मिळवण्यासाठी जलनायक शिवराज पुकळे यांच्या पाठीशी उभा राहून हाक देईल तिथे साथ देण्याचा निर्धार सुळेवाडी करांनी केला.

## मोहोळच्या रशिदा शेख नवोपक्रम पुरस्काराने सन्मानित



**मोहोळ** : मोहोळ येथील अंगन वाडी सेविका रशीदा शेख यांना पूर्व प्राथमिक गटातून राज्य स्तरिय नवोपक्रम पुरस्कार देवून राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने केले सन्मानीत रशीदा अब्दुल शेख या नेहमी च वेगवेगळे उपक्रम राबवत असतात सामाजिक कार्यामध्ये ही त्याचा सातत्याने सहभाग असता हिरकणी गणेश मंडळाचे माध्यमातून त्यांनी महीला वर्गात चांगली जागृती केली आहे लेक लाडकी अभियानात त्यांनी चांगले काम केले आहे सध्या त्या मोहोळ येथील आठवडा बाजार तळ येथील अंगणवाडीत कार्यरत असून माझी अंगणवाडी बोलकी अंगणवाडी या उपक्रमास त्यांना पुरस्कार मिळाला राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र शासनाचे वतीने पुणे येथील महात्मा फुले सभागृह येथे राज्य शैक्षणीक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे सचलक कौस्तुभ दिवेगावकर उपसंचालक डॉ कमलादेवी आवटे व सहसचालक रमाकांत काठमोरे यांच्या हस्ते व तज्ञ प्रशिक्षक यांच्या प्रमुख उपस्थित मोहोळ येथील रशिदा शेख यांना नवोपक्रम राज्यस्तरिय पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात आले या त्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनदन होत आहे



## गाणगापूर पायी पालखी सोहळ्याचे बैरागवाडी येथे स्वागत

**मोडनिंब** : श्री क्षेत्र बारडगाव ते दत्तक्षेत्र गाणगापूर पायी पालखी दिंडी सोहळ्याचे बैरागवाडी (मो) येथे भक्तीमय वातावरणात स्वागत करण्यात आले. यावेळी शिवाजी सुर्वे, तात्या सुर्वे, बाळासाहेब सुर्वे यांनी या सोहळ्याचे आरती करून स्वागत केले. बलसंन्यासी हभप सुरेश महाराज सुद्रिक बारडगाव यांच्या मार्गदर्शनाखाली दतभक्तांच्या पायी दिंडी सोहळ्याने शनिवारी सहा फेब्रुवारी सकाळी प्रस्तान ठेवले आहे. हा सोहळा राशीन, राजुरी, आदिनाथ कारखाना जेऊर, टेंभुर्णी, बैरागवाडी मोडनिंब, मोहोळ, केगाव, कुंभारी, अक्कलकोट, दुधनी, बोमनळी व शेवटी श्रीक्षेत्र गाणगापूर या मार्गाने हा सोहळा पायी जातोय.१८ फेंब्रुवारीला गोरक्षनाथ मठ, खराडे अण्णा गुरुजी संगम गाणगापूर येथे दिंडीचा मुक्काम होईल. या दिडित विणेकरी म्हणून मारुती गावडे हे सेवेकरी आहेत.तर पायी दिंडीची व्यवस्था सुरळीतपणे होण्यासाठी शेळके बेरडी, बापू भोसले, दत्ता भोसले, मधु गिरमकर, रायकर महाराज कापसे, लोंढे, पद्मिनी गिरमकर, निलेश गावडे, नंदु गावडे, अनिल जमादार, बाळु रास्ते, अविनाश पवने, नवनाथ रेके, नंदकिशोर गावडे हे दिंडीची व्यवस्था पहात आहेत. बैरागवाडी मोडनिंब येथून दत्त भक्त या दिंडीत सहभागी झाले आहेत.

## वेश्या व्यवसाय करण्यास बोलवल्या प्रकरणी गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पीडित महिला हिला निशा लॉज येथे वेश्याव्यवसाय करण्यास बोलावून निशा लॉजचा कुंटणखाना प्रमाणे वापर करून त्या महिलेची शारीरिक पिळवणूक करत तिला पैशाचे आमिष दाखवून तिच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतले.

अशा आशयाची फिर्याद महिला पोलीस कॉन्स्टेबल उषा अमोगसिध्द मळगे (नेमणूक अनैतिक मानवी वाहतूक प्रती कक्ष सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. शमा इब्राहिम शेख (वय-४३, रा.राजू नगर), सागर आनंद पाटील (रा.टाकळी) व विश्वनाथ बसवराज मठपती (वय-३९,रा.नीलम नगर, एमआयडीसी) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलीस निरीक्षक साळुंखे हे करीत आहेत.

## संशोधनामुळे करियरला मिळते नवी दिशा : काटकर

### एमआयटी डब्ल्यूपीयूतर्फे हॅकेथॉन २०२३ स्पर्धेचे उद्घाटन

सुराज्य/पुणे

संशोधनावर सतत कार्य केल्यास विद्यार्थ्यांच्या करियरला नवी दिशा मिळते. यातूनच विद्यार्थी यशाची संकल्पना मांडू शकतो. संशोधन हे सर्व समस्यांचे समाधान करणारे असावे. असा सल्ला क्विक हिल टेक्नॉलॉजीचे सीटीओ संजय काटकर यांनी दिला.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित इनोव्हेशन हॅकेथॉन २०२३' स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मुंबई येथील कंपनीचे उपाध्यक्ष निलेश बोरकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड होते.





तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, डॉ. तपण पांडा, कुलसचिव गणेश पोकळे, डॉ. कृष्णा वऱ्हाडे, डॉ. कृष्णप्रसाद गुणाले, विद्यार्थी मुस्कान आणि ऋषीकेश उपस्थित होते. डॉ. तपण पांडा यांनी विद्यार्थ्यांना सतत संशोधन करण्याचा सल्ला दिला. डॉ. कृष्णा वऱ्हाडे यांनी स्पर्धेची माहिती दिली. विद्यार्थी पियूष मोटवाणी व परिवी ब्रह्मभट्ट यांनी सूत्रसंचालन व डॉ. कृष्णप्रसाद गुणाले यांनी आभार मानले.

## पिलीव केंद्रात ४६६ विद्यार्थी देणार दहावीची परीक्षा

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय हे दहावीचे परीक्षा केंद्र आहे. या परीक्षा केंद्रावर एकूण ४६६ विदयार्थी परीक्षा देणार आहेत. एकुण १९ ब्लॉक मध्ये विद्यार्थीची बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. यामध्ये ८ ब्लॉक पेट्रोल पंपाजवळील नवीन ईमारतीत तर ११ ब्लॉक बसस्थानकावरील जुन्या इमारतीत असल्याचे केंद्र प्रमुख कापसे एस डी यांनी सांगितले.

हे परीक्षार्थी विदयार्थी कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय, जवाहरलाल शेतकी विदयालय, शिंगोर्णी येथील संग्राम सिह विदयालय, श्रीनाथ विदयालय तरंगफळ, प्रतापसिंह विदयालय चांदापुरी येथील आहेत. परीक्षा केंद्रावर आरोग्य सुविधा, नियमित वजपुरवठा, पिण्याच्या पाण्याची सोय, तसेच १०० मिटर अंतरावरील झेरॉक्स सेंटर बंद ठेवण्याच्या लेखी सुचना देण्यात आल्या आहेत.

परीक्षेवेळी बैठे पथक, तपासणी पथक तसेच भरारी पथक याची निगरानी राहणार आहे. परीक्षा केंद्रावर एक अपंग विदयार्थी परीक्षा देणार असून त्याच्यासाठी अर्धा तास जास्त वेळ देण्यात येणार आहे. तसेच परीक्षा केंद्रावर कोणताही अनुचित किंवा गैरप्रकार खपवुन घेणार नसल्याचे केंद्रप्रमुख कापसे सर यांनी सांगितले.

## कराटे शिक्षक वाघमारे यांना राजे छत्रपती पुरस्कार

**सांगोला** : वारणा मल्टीपर्पज हॉल सांगली येथे शिवजयंती निमित्त झालेल्या छत्रपती चषक खुल्या स्पर्धा २०२३ रोजी संपन्न झाल्या. यामध्ये २२ मार्शल आर्ट कराटे प्रशिक्षकांना राजे छत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यामध्ये सांगोल्याचे जी के वाघमारे त्यांच्या २७ वर्षाच्या कारकिर्दी बद्दल त्यांना राजे छत्रपती पुरस्कार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेचे महापौर दिग्विजय सूर्यवंशी, सांगली काँग्रेस शहर जिल्हा अध्यक्ष पृथ्वीराज पाटील यांच्या हस्ते राजे छत्रपती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले गेली. २५ वर्षे झाले वाघमारे सांगोला येथे कराटेचे प्रशिक्षण देत आहे सांगोल्यातील मुला मुलींना सक्षम बनवायचे कार्य करीत आहेत. वाघमारे अतिउच्च कार्याबद्दल त्यांना आदर्श शिक्षक राजे छत्रपती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे राजकीय क्रीडा क्षेत्रातून शिक्षक सामाजिक क्षेत्रातून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## सांगोल्यातील जनावरांचा आठवडा बाजार ५ मार्चपासून सुरू होणार : आ.शहाजीबापू

सुराज्य/सांगोला

आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पाठपुराव्याने हा बाजार आता सुरळीत येणाऱ्या पाच मार्च पासून चालू होणार आहे अशी माहिती आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली आहे. तसेच जनावराच्या बाजारसाठी उपयुक्त उपाययोजना करण्याच्या सूचना प्रशासनास देण्यात आल्या आहेत.

गेल्या सहा महिन्यापासून बंद असलेल्या सांगोला येथील जनावरांचा बाजार सुरू करण्यासाठी दि. २४फेब्रुवारी रोजी सांगोला येथे आमदार शहाजीबापू पाटील व सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांची बैठक संपन्न झाली होती.या बैठकीनंतर आमदार शहाजीबापू



पाटील यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे मागणी केल्यानंतर तात्काळ पालकमंत्री यांच्याकडून जिल्हाधिकारी सोलापूर यांना लंपी या रोगाच्या धर्तीवर बंद असणारा सांगोल्यातला महाराष्ट्रातील सर्वात मोठा जनावराचा बाजार चालू करण्याचे आदेश देण्यात आल्यानंतर



जनावराचा बाजार भरण्यास परवानगी मिळाली आहे. लंपी आजाराची खिलार गायी व संकरित गायी जनावरांना लागण झाल्यामुळे सप्टेंबर २०२२ पासून जिल्हाधिकारी सोलापूर यांचे आदेशाने पश्चिम महाराष्ट्रातील जनावरांच्या खरेदी विक्रीसाठी प्रसिद्ध असणारा जर रविवारी भरण्यात येणारा सांगोला येथील जनावराचा आठवा बाजार बंद केला होता.

## कुरघोट जि. प.शाळेत एस.व्ही.इंडस्ट्रीजकडून बोरवेल सेट

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुरघोट येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची पाण्याची गैरसोय लक्षात घेऊन पुणे येथील एस. व्ही. टेक इंडस्ट्रीजच्या वतीने कुरघोट येथील जिल्हा परिषद शाळेला बोरवेलचा संपूर्ण सेट भेट देण्यात आला.



यावेळी एस.व्ही.इंडस्ट्रीजचे चेअरमन लक्ष्मण म्हेत्रे मुख्याध्यापक मल्लिकार्जुन कोळी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष ताय्यना काळे सरपंच पुतळाबाई नेकनारे, ग्रामसेविका मनीषा पाटील, तंटामुक्त अध्यक्ष देवराज बनसोडे, माजी सरपंच बनसिद्ध बन्ने, शालेय व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सूर्यकांत होनमाने, भागांना आटकर, काशीम शेख, श्रीशैल कोळी, उमेश पाटील, कल्पना पाटील, राजकुमार स्वामी, विलास राठोड, मुरहरी जाधव, श्रीनाथ कोळी, रामचंद्र कोळी, आप्पासाहेब बगले, लक्ष्मण बन्ने आदी मान्यवर शिक्षक वृद उपस्थित होते.



## इस्रोचे शास्त्रज्ञ गणेश यांची स्वेरीला सदिच्छा भेट

**पंढरपूर** : स्वेरीला २५ वर्षांच्या शैक्षणिक तपश्चर्येचे फळ मिळत असून हजारो विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची गोडी लागल्याने आज ते विद्यार्थी जागतिक पातळीवर आणि मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत. स्वेरीच्या अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा बौद्धीक विकासास हातभार लागत असून त्यांच्या व्यावसायिक क्षमता देखील भक्कम होत आहेत. स्वेरीचे हे योगदान जसजसे लक्षवेधी ठरत आहे.

तसतसे आता पंढरीच्या पांडुरंगा बरोबरच माळरानावरील शैक्षणिक विठ्ठल मंदिराला भेट देणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. इस्रो' ही भारतातील प्रमुख अंतराळ संस्था आहे. भारताला विकासाच्या दिशेने घेऊन जाण्यात इस्त्रोचे खूप मोठे योगदान आहे. अंतराळ आणि त्यासंदर्भात संशोधन करणे हे मुख्य कार्य असलेल्या इस्त्रोचे शास्त्रज्ञ व्ही.व्ही. गणेश यांनी स्वेरीला नुकतीच सदिच्छा भेट देवून स्वेरीतील संशोधनासंबंधी माहिती जाणून घेतली. त्यांच्या समवेत त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. गणेश हया देखील उपस्थित होत्या. या शास्त्रज्ञ दाम्पत्यांचे स्वागत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ. मिनाक्षी पवार व पब्लिसिटी अँड प्रोटोकॉलचे अधिष्ठाता डॉ. धनंजय चौधरी यांनी केले. स्वेरीचा पंढरपूर पॅटर्न, शिक्षण पद्धती, आदरयुक्त शिस्त व संस्कार तसेच विविध शैक्षणिक, विधायक व सामाजिक उपक्रम पाहून ते भारावून गेले. स्वेरीच्या परंपरेस अनुसरून शास्त्रज्ञ व्ही.व्ही. गणेश व सौ. गणेश यांचा सत्कार करण्यात आला. सत्कारानंतर आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, येणारा काळ हा विद्यार्थ्यांचा असणार आहे.

सुराज्य Classified

**विकणे आहे**

**जमीन विकणे आहे.**

खळवे (माळशिरस) येथील ग.नं.३३३/१/अ क्षेत्र ०.२५५० पो.ख.क्षेत्र ०.०२.०० हे.चौ.मि. एकूण २७ आर जमिन विकणे आहे. संपर्क : नितीन विठ्ठल माने **9960900397**

**विवाह विषयक**

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर

संपर्क : **9763624364, 7410553871** (040323)

# सर्व्हिस रोडचे काम पूर्ण होत नसल्याने वेळापुरातील व्यापाऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा

सुराज्य/वेळापूर

वेळापूर येथील पालखी चौक ते वेळापूर एसटी स्टँड येथे आळंदी ते पंढरपूर पालखी मार्गाचे काम सुरू आहे. शासनाने वेळेत एसटी स्टँड ते आबा बनकर यांचे लॉज हा सर्विस रोड वेळेत सुरू न केल्यास आम्हाला आत्मदहन करावे लागेल असा इशारा व्यापारी वर्गाने दिला आहे.

पण गेली दोन ते तीन महिन्यांपासून व्यापारी व नागरिक हे वेळापूर एसटी स्टँड बाजूकडील सर्विस रोड चे काम वेळेत पूर्ण करावे म्हणून संघर्ष करत आहेत. तीन महिन्यापूर्वी एसटी स्टँड येथे व्यापारी, नागरिकांनी रस्ता रोको करून सर्विस काम



त्वरित सुरू करावे म्हणून मागणी केली होती व प्रशासनाला त्याचे निवेदन दिले होते.

त्यानंतरही येथील व्यापाऱ्यांनी दोन ते तीन निवेदने प्रांत कार्यालय अकलुज येथे निवेदन देऊन तात्काळ सर्व्हिस रोडचे काम करण्याची मागणी केली होती पण त्याची प्रांत अधिकारी अकलूज व अवताडे कंट्रक्शन यांनी दखल घेतलेली नाही. त्यामुळे व्यापारी वर्ग आक्रमक बनला आहे. त्यातच अवताडे कंट्रक्शन कंपनीने रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या संपर्क कार्यालयाजवळील भुयारी मार्गाच्या पुलाचे काम पूर्ण केल्याने एसटी स्टँड बाजूने जाणारा कच्चा तात्पुरता सर्विस रोड हाही भुयारी पुलामुळे जागा कमी झाल्यामुळेअडचण निर्माण झाली होती यातूनच व्यापारी, नागरिक वर्ग, चारचाकी ये जा करत होते पण भुयारी पुलालगतच अवताडे कन्ट्रक्शन कंपनीने नागरिकांचा, व्यापारी वर्गाचा, विद्यार्थ्यांचा कोणताही विचार न करता उड्डाणपुलाचे काम सुरू केल्याने सर्विस रोड साठी असणारी सर्व जागा ही उड्डाणपुलाच्या मार्गात गेल्याने गेले अनेक दिवसापासून येथील वेळापूर एसटी स्टँड ते आबा बनकर यांचे लॉज हा सर्विस मार्ग पूर्णपणे बंद पडलेला आहे. त्यामुळे व्यापारी वर्गाचे ग्राहका विना मोठे नुकसान होऊ लागले आहे. सर्वात जास्त नुकसान हे व्यापारी वर्गाचे होत असून व्यापाऱ्यांची दुकानदारी ग्राहक येत नसल्याने बंद पडली असून व्यापाऱ्यांना बँकेचे, पतसंस्थेचे हप्ते कसे भरायचे असा प्रश्न पडला आहे.

# बार्शीत मोकाट ३०० वराहांचा पालिकेने केला बंदोबस्त

## ▶▶ दगडफेक करून विरोध करणारांवर गुन्हा दाखल



सुराज्य/बार्शी

बार्शी शहरामध्ये सार्वजनिक ठिकाणी मोकाट वराहांचा (डुकरांचा) वाढता वावर आणि शहरातील नागरिकांच्या वराह बाबतीत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारींच्या अनुषंगाने बार्शी नगरपरिषदेने कारवाई ठेकेदारांच्या माध्यमातून कारवाई करत ३०० मोकाट वराह पकडले. हे सर्व वराह ठेकेदार इतर ठिकाणी घेवून गेला.

शहरातील सर्व वराहपालन करणाऱ्या व्यक्तींची दि १६ नोव्हेंबर रोजी मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित बैठकीमध्ये वराह पालन करणाऱ्या व्यक्तींना १५ दिवसांत सार्वजनिक ठिकाणी मोकाट फिरणाऱ्या वराहांचा बंदोबस्त करून स्वतःच्या जागेत बंदिस्त ठिकाणी त्यांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तसेच यापूर्वीही वराह पालन करणाऱ्या व्यक्तींवर नगरपरिषदेकडून गुन्हे व दंडात्मक कारवाई करण्यात आलेली होती.

सदरची कारवाई करून देखील वराहपालन करणाऱ्या व्यक्तींवर याचा काहीही उपयोग होत नसल्याचे दिसून आले. शहरातील सार्वजनिक ठिकाणी मोकाट वराहांचा वावर खूपच प्रमाणात झाल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊन याबाबत पालिकेकडे तक्रारी देण्यात आल्या होत्या.

यावर उपाययोजना म्हणून नगरपरिषदेकडून शहरातील मोकाट वराहांचा बंदोबस्त करण्यासाठी जाहीर निविदा प्रसिद्धीकरण करून सदर कामाचा आदेश हुबळी येथील ठेकेदारास देण्यात आला. मोकाट वराह पकडण्यासाठी संबंधित वराह मालकांकडून प्रतिकार होण्याची शक्यता लक्षात घेवून नगरपरिषदेकडून रितसर पोलिस बंदोबस्ताची मागणी देखील करण्यात आलेली होती.

त्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारामार्फत दि २८ फेब्रुवारी रोजी तीन वाहनाद्वारे शहरातील अंदाजे ३०० मोकाट वराह पकडण्यात आलेली आहेत. सदरची कार्यवाही करतेवेळी नगरपरिषदेचे आरोग्य विभाग प्रमुख शब्बीर वस्ताद, स्वच्छता निरीक्षक- नितीन शेंडगे यांच्यासह आरोग्य विभागाकडील कर्मचारी उपस्थित होते.

### बंदोबस्त मिळालाच नाही, वातावरण चिघळल्यानंतर आले पोलीस

वराह मालकांचा कारवाईस विरोध होईल या शक्यतेने पालिकेने पोलीस बंदोबस्त मागितला होता. पण पोलिसांनी वराह पकडण्याची कार्यवाही आपल्या स्तरावरून करावी. वराह मालकांकडून विरोध होत असल्यास विरोध करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी असे उलट टपाली पालिकेस कळविले. त्यानंतर दि २८ रोजी विना पोलीस बंदोबस्त वराह पकडण्याची कार्यवाही चालू असताना संबंधित वराह मालक व महिलांनी प्रतिकार हुज्जत घालून नगरपरिषद कर्मचारी व संबंधित ठेकेदार यांचेवर दगडफेक केली. यात अभयराज ओहोळ हा कर्मचारी किरकोळ जखमी झाला. कामात अडथळा आणण्यासाठी वाहनाच्या पुढे आडवे झोपले. वातावरण तापल्यानंतर पालिका कर्मचाऱ्यांनी बार्शी शहर पोलिसांना कळवल्यानंतर पोलीस घटनास्थळी आले. त्यानंतर संबंधित वराह मालक निघून गेले.

### दगडफेक करत विरोध करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

या कारवाईस दगडफेक करत विरोध करणाऱ्या संशयितांवर बार्शी शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. पांडू पवार, सुनिल पवार, चुई पवार व इतर अनोळखी १० ते १२ पुरुष व महिला यांच्यावर हा गुन्हा दाखल झाला आहे.

### पालिकेचा इशारा

वराह मालकांनी त्यांचे स्वतःच्या मालकीच्या जागेमध्ये बंदिस्त वराहपालन करावे. नगरपरिषदेच्या सार्वजनिक रस्त्यावर वराह आढळून आल्यास यापुढेही अशीच कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा नगर पालिका प्रशासनाने दिला आहे.



## फेब्रुवारीत जीएसटीमधून १.५ लाख कोटींची वसुली

**नवी दिल्ली** : अर्थ मंत्रालयाने आज फेब्रुवारी महिन्यातील जीएसटी कर संकलनाची आकडेवारी जाहीर केली आहे. फेब्रुवारी महिन्यात जीएसटी कर संकलन १,४९,५७७ कोटी रुपये इतके झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत १२ टक्क्यांची तेजी दिसून आली. फेब्रुवारी महिन्यातही महाराष्ट्रातून सर्वाधिक जीएसटी वसूल करण्यात आला. दुसऱ्या स्थानावर कर्नाटक राज्य आहे. मात्र, कर्नाटकच्या तुलनेत महाराष्ट्राचे उत्पन्न जवळपास दुप्पट आहे. महाराष्ट्रातून फेब्रुवारी २०२३ मध्ये २२ हजार ३४९ कोटींचा जीएसटी जमा करण्यात आला. तर, कर्नाटक राज्यातून १० हजार ८०९ कोटी रुपयांचा जीएसटी कर जमा करण्यात आला. तिसऱ्या स्थानावर गुजरात राज्य आहे. गुजरातने मागील महिन्यात ९ हजार ५७४ कोटींचा कर जमा केला.

सरकारने आयजीएसटी मधून नियमित थकबाकीपोटी ३४,७७० कोटी सीजीएसटी आणि २९,०५४ कोटी एसजीएसटी ची थकबाकी दिली आहे. फेब्रुवारी २०२३ मध्ये नियमित थकबाकी नंतर केंद्र आणि राज्यांकडून जमा झालेला एकूण महसूल, CGST साठी ६२,४३२ कोटी आणि SGST साठी ६३,९६९ कोटी इतका आहे. याव्यतिरिक्त, केंद्राने शिल्लक GST भरपाई पोटी, जून २०२२ या महिन्यासाठी १६,९८२ कोटी, तर आधीच्या कालावधीसाठीची प्रमाणित आकडेवारी पाठवणारी राज्ये/केंद्रशासित प्रदेश यांना १६,५२४ कोटी रक्कम जारी केली होती. जानेवारी महिन्याच्या तुलनेत फेब्रुवारीमध्ये जीएसटी महसुलात घट झाली आहे. जानेवारी २०२३ मध्ये १.५७ लाख कोटी रुपयांचे कर संकलन झाले आहे.

आतापर्यंतचा हा दुसरा क्रमांकाचा सर्वाधिक आकडा आहे. एप्रिल २०२२ मध्ये १.६८ लाख कोटी रुपयांचा महसूल जीएसटीद्वारे मिळाला होता. हा आतापर्यंतचा सर्वाधिक आकडा आहे. अर्थ मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी २०२३ मध्ये एकूण GST संकलन १,४९,५७७ कोटी रुपये आहे. यापैकी केंद्रीय GST (CGST) २७,६६२ कोटी रुपये आहे. तर राज्य GST (SGST) कर संकलन ३४,९१५ कोटी रुपये आहे. तर IGST ७५,०६९ कोटी रुपये जमा झाले आहेत. याशिवाय ११,९३१ कोटी रुपयांच्या उपकराचाही समावेश आहे.

वर्षभरापूर्वी याच महिन्यात जीएसटी संकलन १.३३ लाख कोटी रुपये होते. फेब्रुवारी २०२३ शी तुलना करता जीएसटी संकलन वार्षिक आधारावर १२ टक्क्यांनी वाढले आहे. फेब्रुवारी महिन्यात केवळ २८ दिवस असल्याने जीएसटी संकलन इतर महिन्यांच्या तुलनेत कमी असल्याकडे ही अर्थ मंत्रालयाने लक्ष वेधले आहे.

## कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या घोषणांनी बार्शीत तहसील परिसर दणाणला

सुराज्य/बार्शी

शेतकऱ्यांना कांद्यासाठी हमीभाव मिळावा. आतापर्यंत कमी भावामध्ये विकलेल्या कांद्यास अनुदान मिळावे. तसेच शेतकऱ्यांवर होत असलेला अन्याय दूर करण्यात यावा. या मागणीसाठी तालुक्यातील बोरगाव (झाडी) येथील कांदा उत्पादक शेतकरी राजेंद्र चव्हाण यांच्यासह तिघेजण बार्शी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत.

राजेंद्र तुकाराम चव्हाण, रा. बोरगांव (झा) ता.बार्शी यांचा कांदा सोलापूर येथील सुर्या ट्रेडर्स या आडत दुकानी विकण्यात आला होता. भाव कमी होत होता म्हणून मी १० पोती कांदा सूर्या ट्रेडर्स घेवून गेल्यानंतर मला सर्व खर्च वजा जाता आडत दुकानदाराने २ रूपयांचा चेक दिला. सदर चेक १५ दिवसांनी खात्यावर जमा होणार आहे असे सांगुन त्यावर दिनांक टाकुन देण्यात आली आहे. तरी सदरील चेक हा माझ्या खात्यावर जमा करण्यासाठी मला सोलापूर येथे जावे लागत आहे. जर २ रुपयांच्या चेकसाठी मला सोलापूर येथे जावे लागत असेल तर मला खर्च ३०० येतो. म्हणून महाराष्ट्र राज्य सरकारने व भारत सरकारने याची दखल घ्यावी.असे निवेदनात म्हटले आहे. चव्हाण यांच्या सोबत यशवंत कोकाटे, दादासाहेब कोरके, सुजित बोधले हे देखील उपोषणास बसले आहेत. यावेळी बाबा बोधले, माजी सभापती लक्ष्मण संकपाळ उपस्थित होते.यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी कांदयाला हमीभाव मिळालाच पाहिजे, कांदयाला अनुदान मिळालेच पाहिजे, कांदयावरील निर्यात बंदी उठवलीच पाहिजे, या मागण्यांची तहसील परिसर दणाणून सोडला.

## मुरूम चोरावर करवाईसाठी पती-पत्नीने जिल्हाधिकारी कार्यालयात मागितला जोगवा

सुराज्य/सोलापूर



सुपीक शेत जमिनीतून माती आणि मुरूम चोरून नेणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ मोहोळ तालुक्यातील शेजबाभुळ गावातील शेतकरी पती-पत्नीने सोलापुरात बुधवारी जोगवा मांगो आंदोलन करत जिल्हा प्रशासनाचे लक्ष वेधले.

शेतकरी अशोक ओहोळ व प्रभावती ओहोळ आंदोलन करणाऱ्यांचे नाव आहे. गट नं. २३० मध्ये ४ हेक्टर जमीनीपैकी ६ एकर जमीनीमधील सुपीक माती व विहीरीचा उपसा चोरुन नेहलेला आहे. ४ एकर ज्वारीचे उभे पीक चोरून नेहलेले आहे. बोअरमध्ये दगडे टाकून बुजविलेली आहे. पत्राशेड फाडून दरवाजा तोडून कामाचे साहित्य व प्रापचिक साहित्य चोरीला गेले आहे. सर्व मिळून ४ ते ५ लाखाचे नुकसान झाले आहे. चोरावर कारवाई करण्याची मागणी करत जिल्हाधिकारी कार्यलयाजवळ आंदोलन करत जोगवा मागितला याबाबत अनेक वेळा पाठपुरावा केला. मात्र दखल घेतली नाही त्यामुळे नाईलाजाने हे आंदोलन करावे लागत आहे. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन चालू ठेवणार असल्याचे आंदोलन पती पत्नीने जाहीर केले.



## व्ही.जी.शिवदारे महाविद्यालयास नॅक मूल्यांकनात ए श्रेणी

**दक्षिण सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचालित व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स या महाविद्यालयास ए श्रेणी मिळाली आहे.

नॅक कमिटी, बेंगलोर यांनी दि. २३ व २४ फेब्रुवारी रोजी मुल्यांकन करण्याकरिता भेट दिली होती. महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांना उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधा, प्राध्यापकांचे संशोधन, महाविद्यालयाचे सामाजिक कार्य या संदर्भात पाहणी करून महाविद्यालयास ही श्रेणी देण्यात आली. या कमिटीत डॉ. प्रवाकर राथ (कुलगुरू, मिझोराम युनिव्हर्सिटी) डॉ. सुरेश चांद (डीन, देवी अहिल्या युनिव्हर्सिटी, इंदौर) डॉ. चन्नबसवनगौडा यटनल्ली (प्राचार्य हुबळी, कर्नाटक) यांचा समावेश होता. कायम विनाअनुदानित तत्वावर चालणाऱ्या या महाविद्यालयाचा दर्जा व कामकाज उत्तमरित्या असल्याची नोंद समितीने घेतलेली असून हे अभिमानास्पद आहे. संस्था व महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी या सर्वांच्या श्रमातून हे यश प्राप्त झाले आहे अशी प्रतिक्रिया संस्थेचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी दिली आहे. संस्थेचे विश्वस्त प्रा. भिमाशंकर शेटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.एस. सुत्रावे, आयक्यूएसी समन्वयक डॉ.ए.बी. वळसंगे, नॅक समन्वयक प्रा. गोपिका मंजुनाथ, कार्यालयीन अधीक्षक व्ही.एस. किलजे यांनी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

## ‘गाभ’ चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

**सोलापूर** : अभिनय आणि लिखाण या माध्यमातून अभिनेता कैलास वाघमारे यांनी आजवर वेगवेगळ्या प्रवाहातील गोष्टी आपल्यासमोर मांडल्या आहेत.आगामी गाभ’ या मराठी चित्रपटातील कैलासची भूमिका आणि विषय संवेदशील असला तरी त्याचा रोमँटिक अंदाजही प्रेक्षकांना दिसणार आहे.ही कथा एका मानसिकतेचं प्रतिनिधित्व करणारी भूमिका कैलास आपल्या दादू’ या पात्रातून साकारणार आहे. गाभ’ चित्रपटाची संकल्पना, लेखन आणि दिग्दर्शन अनुप जत्राटकर यांचे आहे. सुमन नारायण गोटुरे आणि मंगेश नारायण गोटुरे या चित्रपटाचे निर्माते आहेत. सहनिर्माते अनुप जत्राटकर आहेत.

## केएचसीचे नवे पर्व लवकरच भेटीला

**सोलापूर** : लवकरच येतंय कोण होणार करोडपतीचं पुढचं पर्व धनलक्ष्मी, प्रतिष्ठा आणि प्रेक्षकांची मनं जिंकण्याची हीच वेळ आहे. यावर्षी स्पर्धकांना १ मिस्डकॉल देऊन दोन करोड रुपये जिंकण्याची संधी आहे. कोण होणार करोडपती या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन अभिनेते सचिन खेडेकर करणार आहेत. स्पर्धकांना १४ दिवसांत १४ प्रश्न विचारण्यात येणार आहेत. जितके जास्त प्रश्न तितक्याच जास्त संधी. २ मार्चपासून १५ मार्चपर्यंत रोज एक प्रश्न, असे १४ प्रश्न विचारले जाणार आहेत. ७०३९०७७७७२ या क्रमांकावर मिस्डकॉल देऊन किंवा सोनी लिव्ह पवर जाऊन प्रेक्षकांना नोंदणी करता येईल.

## शेतकऱ्यांवर अन्याय : हिंडोळे

### सुरत-चेन्नई महामार्ग मोबदला अक्कलकोटचे शेतकरी झाले आक्रमक



सुराज्य/अक्कलकोट

सुरत-चेन्नई हा ग्रीन फिल्ड महामार्गच्या मोबदला वरून अक्कलकोट तालुक्याती शेतकरी नाराज आहे. वाढीव मोबदला द्यावा अशी मागणी केली आहे. या प्रकरणात जिल्हा प्रशासनाने शेती दराच्या नोटिसा देण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये तुटपुंजा दर असल्याने शेतकऱ्यांमधून संतापाचे वातावरण आहे. अक्कलकोटचे माजी नगरसेवक महेश हिंडोळे यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील शेतकऱ्यांनी बुधवारी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांची भेट घेतली.

अक्कलकोट तालुक्यामध्ये जमिनींचे भाव किमान दहा ते पंधरा लाखाच्या वर एकरी आहेत असे असताना तीन ते पाच लाख रुपये दर मिळणे ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. नुकतेच एका कांदा उत्पादक शेतकऱ्याला पाचशे किलो कांदा विकून दोन रुपये पट्टी मिळाली तशी थट्टा तर सरकार शेतकऱ्यांची करत नाही ना? असा प्रश्न उपस्थित करीत शेतकऱ्याला किमान १५ लाख रुपये एकरी दर मिळावा अन्यथा तीव्र आंदोलन उभे करू असा इशारा दिला.यावेळी सुरेखा होळीकट्टी, डॉ गुलापल्ली, नांनु कोरबू, सोमलिंग निंबाळ, चेतन जाधव, सिद्धाराम कोरे, शांतप्पा हौदे, भीमण्णा माळी, वाहिद नाईकवाडी, सुनील दसले, लक्ष्मीपुत्र तेलुनगी, जग्गनाथ कलमनी, बसवराज हंबलगी, शंभू आकातनाल, मजलीस बागवान, राजशेखर कुंभार, विजय चव्हाण, प्रशांत शिंदे, शिवाजी पाटील, मल्लिनाथ दसाडे, शिवयोगी ठक्का, संजय म्हेता आदींसह ३०० शेतकरी उपस्थित होते.

## स्पर्धेच्या माध्यमातून पंढरपुरात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडावेत : परिचारक

सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या औचित्य साधून, पंढरपूर येथे अखिल भारतीय (निमंत्रित) शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन मा.आ.प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे होते.

याप्रसंगी बोलताना प्रशांतराव परिचारक यांनी अखिल भारतीय स्तरावरील शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन केल्याबद्दल पंढरपूर व्हॉलीबॉल संघातील सर्व सदस्यांचे कौतुक केले. अजिंक्य क्रीडा मंडळाच्या माध्यमातून पंढरपुरात विविध क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले जात आहे. मंडळाच्या माध्यमातून जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याद्वारे पंढरपुरातील स्थानिक खेळाडूंना उत्तम खेळाडूंचा,कौशल्यपूर्ण खेळ पाहण्यास मिळावा व नवोदित खेळाडूंना प्रेरणा मिळावी हा उद्देश असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

या स्पर्धेसाठी आवर्जून उपस्थित असलेले ऑल इंडिया शूटिंग व्हॉलीबॉल फेडरेशनचे सचिव रविंद्र तोमर यांनी पंढरपूरच्या पवित्र भूमीत या राष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या व खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करून प्रेक्षकांना आनंद द्यावा असे आवाहन केले. याप्रसंगी क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल संतोष पाटील सर, चेतन धनवडे सर, प्रा. सुभाष मस्के सर व राष्ट्रीय खेळाडू प्रीती काळे, अमृता माने, शिवानी यड्रावकर यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय स्तरावर व्हॉलीबॉल खेळामध्ये उत्तुंग कामगिरी केल्याबद्दल भारतीय व्हॉलीबॉल संघाचे उपकर्णधार जयंत खंडागळे यांचाही सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी पंढरपूर अर्बन बँकेचे चेअरमन सतीश मुळे, पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन कैलास खुळे सर,संचालक लक्ष्मणतात्या धनवडे,जिल्हा परिषद सदस्य सुभाषराव माने सर, मा.नगराध्यक्ष लक्ष्मण शिरसट,वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर अरुण फुगे साहेब, मा. नगरसेवक गणेश अधटराव, मा.नगरसेवक विक्रम शिरसट, अर्बन बँकेचे संचालक मनोज सुरवसे, महाराष्ट्र शूटिंग व्हॉलीबॉल फेडरेशनचे सचिव विष्णू निकम, कार्याध्यक्ष राजेंद्र नांद्रेकर. व्हॉलीबॉल खेळातील शिवछत्रपती पुरस्कार विजेते सदाशिवराव माने व राजेंद्र मोहिते तसेच आंतरराष्ट्रीय पंच जावेद मनोरे, अरविंद पाटील, सुरेश पाटील, रफिक मोहम्मद उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राध्यापक सुभाष मस्के यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्पर्धा संयोजन समितीचे अध्यक्ष शशी भोसले, सचिव नागनाथ क्षिरसागर,गजेंद्र पवार सर, संतोष गायकवाड, सोमनाथ कराळे, राहुल शिंदे साहेब, सखाराम भराटे, राजेंद्र अष्टेकर, मामा जगदाळे सर, नारायण देशमुख सर, विजय मोटे, सागर खाडे, हरी परदेशी, अमोल शिर्के, रेवण चंदनशिवे, राहुल दळवी सर,तुकाराम गुळुमकर, माऊली कुंभार, वल्लभ पांढरे, अजित मोरे, प्रताप मुळे, संतोष पाटोळे, विकी साळुंखे, संदीप खेडकर, आनंद भोसले, सौदागर थोरात, जालिंदर शेलार सर, शामराव शिंदे शामराव माने गौतम सर ,हारचंद पावरा, सुरेशभाऊ चौगुले, रघुनाथ अधटराव, कदम साहेब, लक्ष्मण सातपुते, दादासाहेब मोहोळकर, रावसाहेब देशमुख, सुनील गाडे, शिवाजी भोसले, सचिन पाटील, चंद्रकांत इंगळे साहेब, प्रकाश डबीर, कार्तिक, महाजन साहेब यांनी अथक परिश्रम घेतले.

## बँकेचा कडीकोयंडा उचकटून १६ हजार रूपयांची चिल्लर पळवली

### ▶▶ चोरट्याने जाता जाता लावली आग, टेबलवरील एक कॉम्प्युटर, काही रजिस्टर जळून खाक
### ▶▶ बार्शीत डीसीसी बँकेच्या शिवाजीनगर शाखेतील घटना

सुराज्य/बार्शी

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या बार्शीतील शिवाजीनगर शाखेचा कडीकोयंडा उचकटून आत प्रवेश करून स्ट्राँग रूमचा दरवाजा उचकटून एका तिजोरीतील १० रूपयांचे क्वाईनच्या स्वरूपातील १६ हजार रूपये रक्कम अज्ञात चोरट्याने नेली. जाता जाता चोरट्याने आग लावली. यात एक कॉम्प्युटर व कांही महत्वाची रजिस्टर पेटवून दिली. सकाळी १० च्या सुमारास बँक उघडण्यास आलेल्या महिला कर्मचाऱ्यास चोरीची घटना लक्षात आल्यानंतर त्यांनी वरिष्ठांना कल्पना दिल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. दरम्यान, तत्काळ अग्निशामक दलास पाचारण करून बादल्याने पाणी ओतून आग विझवण्यात आली. याप्रकरणी शाखाधिकारी फरियाल रहिम शेख रा. पाटील प्लॉट, बार्शी यांनी याप्रकरणी फिर्याद दिली असून अज्ञात चोरटयाविरोधात शहर पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डीसीसी बँकेची शिवाजीनगर शाखा सकाळी १० वाजता सुरू होवून सायंकाळी ६ वाजता बंद होते. दि. २७ रोजी नेहमीप्रमाणे सायंकाळी ६ वा. बँक बंद करून बँकेचे समोरील दोन लाकडी दरवाजास कुलूप लावून शाखाधिकारी व कर्मचारी घरी गेले. दि. २८ रोजी सकाळी १० वा. बँकेतील शिपाई पाटील मॅडम तेथे गेल्या. त्यावेळी त्यांना एका लाकडी दरवाजाचा कडीकोयंडा उचकटलेला व बँकेतून धूर येत असताना दिसला. त्यांनी शाखाधिकारी मॅडम यांना फोन करून सदरची घटना सांगितली.

त्यानंतर त्या लगेच बँकेत पोहोचल्या. त्यावेळी इतर कर्मचारीही तेथे आले होते. बँकेतून धूर येत असल्याचे पाहून त्यांनी डीसीसी मुख्य शाखेतील शाखाधिकारी गाढवे यांना फोन करून घडला प्रकार सांगितला. ते तेथे पोहोचल्यानंतर त्यांनी पाहिले असता बँकेचा एक लाकडी दरवाजाचा कडीकोयंडा उचकटलेला होता. त्यामुळे त्यांनी दुसऱ्या दरवाजाचे कुलूप उघडून बँकेच्या महत्वाची कागदपत्रे व फाईल्स जळालेल्या होत्या. स्ट्राँग रूम मध्ये जावून पाहिले असता स्ट्राँग रूमच्या लाकडी दरवाजाचे कडीकोयंडा उचकटलेला होता. त्यांनी स्ट्राँग रूममध्ये जावून पाहिले असता एक लोखंडी तिजोरी व्यवस्थित होती व दुसरी लहान लोखंडी तिजोरी उघडी होती.

त्यात ठेवलेली १० रूपयाचे कॉईन रक्कम १६ हजार रू. हि तिजोरीमध्ये नव्हती. त्यावरून बँकेत चोरी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. बँकेतील वस्तू व कागदपत्रे जाळून १५ हजार रूपयांचे नुकसान झाले अशा आशयाची फिर्याद दिली आहे.घटनेनंतर पोलीसांनी घटनास्थळी भेट देवून पंचनामा केला. अधिक तपास सपोनि सुधीर तोरडमल करत आहेत.

# अक्कलकोटसाठी २३ कोटी ८५ लाख निधी मंजूर : आ.कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट नगरपरिषद हद्दीत प्रलंबीत असलेल्या अनेक कामांना आता एकूण २३ कोटी ८५ लाख एवढा विक्रमी निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे.



शहरात गेल्या अनेक दिवसांपासून वेगवेगळ्या कामांसाठी निधीची आवश्यकता होती आमदार कल्याणशेट्टी हे मागील आठ ते दहा महिन्यापासून मोठ्या प्रमाणावर निधी आणण्याचे प्रयत्न करीत आहेत .विविध योजना व मंजूर रक्कम पुढीलप्रमाणे: विवेकानंद पार्क सिमेंट रस्ता, म्हाडा कॉलनी सिमेंट रस्ता, जंगी प्लॉट सिमेंट रस्ता, ममनाबाद रोड शौचालय, सेवालाल नगर ते शिवपुरी सिमेंट रस्ता, उत्तर पोलीस ठाणे समोर सिमेंट रस्ता, प्रभाग आठ सिमेंट रस्ता, प्रभाग दोन अंतर्गत रस्ता, प्रभाग तीन अंतर्गत रस्ता, प्रभाग पाच म्हेत्रे नगर अंतर्गत रस्ता, प्रभाग अकरा गटार बांधणे, प्रभाग अकरा जंगी प्लॉट रस्ता व गटारी, प्रभाग दहा पुकाळे प्लॉट, प्रभाग तीन गटार, प्रभाग दहा दाता नगर सिमेंट रोड, प्रभाग दहा दाता नगर अंतर्गत रस्ता, प्रभाग क्रमांक दहा पुकाळे प्लॉट सिमेंट रस्ता, प्रभाग क्रमांक ९ सिमेंट रस्ते व गटार श्री स्वामी समर्थ बायपास चौक येथे सीडी वर्क, होटकर गल्ली ते पंच तालीम गटार बांधणे, बुधवार पेठ येथील समाज मंदिर जवळ कंपाउंड वॉल बांधणे, भीम नगर येथे शौचालय व गटार बांधणे, साखर विहिरींजवळ अभ्यासिका बांधणे आदीं कामांचा समावेश आहे. या सर्व कामाच्या मंजुरीसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आदींचे सहकार्य लाभले आहे, असे कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले आहे.

**एमएसईबी चौक-सोलापूर रोडसाठी १० कोटी**
एमएसईबी चौक ते सोलापूर रोड रस्त्याला जोडणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी वैशिष्टपूर्ण योजनेद्वारे एकूण १० कोटी रुपये मंजूर झाली आहेत. त्यातून चार पदरी रस्ता बनवला जाणार आहे त्याने अक्कलकोट शहरात येणाऱ्या चार चाकी वाहनांची अडचण दूर होणार आहे, असे आ. कल्याणशेट्टी यांनी सांगितले.

# शहर-जिल्ह्यात शिवगर्जना अभियान जोरात राबवणार : संपर्कप्रमुख कोकीळ

२ मार्च ते ४ मार्च दरम्यान अभियान

सुराज्य/सोलापूर

**शिवसेना पक्षप्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार राज्यभर शिवगर्जना अभियानचे आयोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यामध्येही हे अभियान जोरात राबवण्याचा निर्धार शहर व जिल्ह्यातील शिवसेनेच्या वतीने सर्वांनी एक दिलाने काम करण्याची गरज असल्याचे मत शिवसेना संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी व्यक्त केले.**



बुधवारी विश्रामगृहामध्ये आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये कोकीळ हे बोलत होते.यावेळी शहर उत्तर ,शहर मध्ये, दक्षिण सोलापूर,उत्तर सोलापूर, अक्कलकोट, मोहोळ विधानसभा मतदारसंघातील पदाधिकारी शिवसैनिक यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. २ मार्च ये ४ मार्च या कालावधित शिवसंवाद अभियान राबवण्यात येणार आहे. याचा आढवा घेऊन पुढे बोलताना कोकीळ म्हणाले की, शिवसेना पक्ष हा शिवसैनिकाच्या ताकदीवर उभा राहिलेला आहे .आजही शिवसैनिक उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबरच आहे. त्याचबरोबर महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनता उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी आहे. सरकारमध्ये सुरू असलेला खेळ सर्व - सामान्य नागरिकांना तोंडपाठ झाला आहे. त्यामुळे कोण खर आणि कोण खोटं हे आता सांगायची गरज उरली नाही. भाजपचा पडदा आता पार झालेला आहे. भारतीय जनता पक्षामध्ये हिम्मत असेल तर त्यांनी निवडणुका घेऊन दाखवाव्यात .जनतेच्या दरबारात कौल मागावा असे आव्हान त्यांनी केले. या बैठकिस शहर प्रमुख विष्णू कारमपुरी, जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बरडे, अमर पाटील, अजय दासरी, अस्मिता गायकवाड, प्रताप चव्हाण, लहू गायकवाड, संतोष बिराजदार, आनंद बुक्कानुरे ,रितेश सकपाळ ,दिगंबर पाटणकर, उमेश अधिकारी, चंद्रकांत पवार, बाबू चव्हाण, काशिनाथ भासुतकर, आधी जण उपस्थित होते. या शिवगर्जना अभियानामध्ये शिवसेना उपनेते विनोद घोसाळकर, शिवसेना महिला आघाडी संपर्क प्रमुख सोलापूर संजना घाडी, माजी खासदार सुभाष वानखेडे, युवा सेनेचे साईनाथ दुर्गे, युवा सेनेच्या सुप्रभा फातप्रेकर, आदीजण जिल्ह्यातील वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये दौरे करत शिवगर्जना अभियान राबवण्यासाठी शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

**सोलापूर** : अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना दि.२३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून आकाश इंगळे (वय-२५,रा. सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पीडित मुलगी ही भाजी घेऊन घराकडे येत असताना आकाश याने पीडित मुलीचा पाठलाग करून तिच्याशी अरेरावीची भाषा करत त्याच्या मोबाईल मध्ये फोटो काढला. तपास पोसई रजपूत हे करीत आहेत.

## सिव्हिल हॉस्पिटलमधून दुचाकी पळवली

**सोलापूर** : हँडल लॉक करून पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३. डीसी.८६८८ ही अज्ञात चोरट्याने सिव्हिल हॉस्पिटल मधील बी ब्लॉक समोरून चोरून नेली आहे. ही घटना दि.२२ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान घडली.याप्रकरणी बालाजी शिवाजी आवताडे (वय-३५,रा.मु.पो.कासेगाव तालुका दक्षिण सोलापूर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. मुलाणी हे करीत आहेत.

## आष्टे येथे सत्तुर आणि गजाने मारहाण

**सोलापूर** : आष्टे (ता.मोहोळ) येथील दूधडेरी जवळ सत्तुर,लोखंडी गज आणि दगडाने केलेल्या मारहाणीतत सोमनाथ महादेव वाघमोडे (वय रा.आष्टे) हे गंभीर जखमी झाले. ही घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. त्यांना मोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. वाघमोडे हे काल रात्री डेअरीमध्ये दूध घालण्यासाठी गेले होते. त्यावेळी बालाजी सोडगे आणि संजय सोडगे या दोघांनी त्यांना विनाकारण मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## शेळगीतून लोखंडी साहित्य लंपास

**सोलापूर** : शेळगी येथील जागेवर ठेवलेले तीस हजार रुपये किमतीचे ६०० किलो वजनाचे लोखंडी साहित्य चोरट्याने चोरून नेल्याची घटना दि.२८ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता दरम्यान शेळगी येथे घडली.याप्रकरणी दिनेश मल्लिनाथ कट्टे (वय-३९,रा.भवानी पेठ,मड्डी वस्ती,सोलापूर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो.हे.कॉ. गायकवाड हे करीत आहेत.

# भूसंपादनासह शासकीय जागांचा तिढा; उड्डाणपुलासाठी पालकमंत्र्यांसमवेत बैठक होणार

**सोलापूर** : जुना पुणे नाका ते पत्रकार भवन या फेज एकमधील उड्डाणपुलाच्या भूसंपादनाचे काम अंतिम टप्प्यात आहे. यासाठी निधीची आवश्यक आहे.. त्याचबरोबर फेज दोनमधील कामाला गती येण्यासाठी आता आवश्यक निधी व तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी पालकमंत्र्यांसमवेत बैठक लावण्यात येणार असून तत्पूर्वी प्रशासनाकडून आढावा घेण्यात आला.



शहरातील उड्डाणपूल भूसंपादनाचे काम वेगाने सुरू असले तरी निधीच्या कमतरतेमुळे आणि मालमत्ता पत्रक ब या सत्ता प्रकारामध्ये मालकी हक्क ठरविताना तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने कामाला ब्रेक लागत आहे. यासंबंधी आयुक्त शीतल तेली-उगले यांनी बुधवारी आढावा बैठक घेतले असून यावेळी भूसंपादन अधिकारी केशव जोशी, भाजपचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख उपस्थित होते. फेज एकमधील ५.५ कि.मी मार्गाचे चार टप्प्यातील निवाडा यादी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मंजूर करून घेण्यात आली आहे. शासकीय जागा वगळता इतर खासगी जागांचा निवाडा करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून खासगी १०२ मिळकतींपैकी ७३ मिळकतींच्या निवाड्याला जिल्हाधिकाऱ्यांकडून मान्यता मिळाली आहे. फेज वनचे भूसंपादन अंतिम टप्प्यात आहे. परंतु भूसंपादनाचीरक्कम महापालिकेकडून वेळेत मिळणे अपेक्षित आहे. उड्डाणपूलासाठी महापालिका मुफ्राकंपनीकडून कर्ज घेतले आहे. कर्जाची रक्कमही मंजूर आहे, परंतु वर्षनिहाय बदलेल्या रेडीरेकनर दरामुळे भूसंपादन रक्कमेत वाढ झाली आहे. तो निधी उभा करण्याबरोबर शासकिय जागांचा तिढा सोडविण्यासाठी पालकमंत्र्यांकडे बैठक लावण्यात येणार आहे. या बैठकीत उड्डाणपूलाचा विषय मार्गी लावण्यासाठी आवश्यक निधी, जागा यांबाबतची माहिती संकलित करून अहवाल तयार करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी संबंधित विभागाला या बैठकीत दिले.

**मिळकतींचा निवाड्यात अडचणी**
हेरिटेजच्या यादीत असलेले आहेरकर बजार, सर्व्हिस रोडवर येणारे वैष्णवी हॉटेलचे कॉलम, सर्व्हिस रोडला बाधित होणारी नाथ प्लाजाची गॅलरी, पुर्नवसनाची मागणी असलेली काडादी चाळ, पांजरापोळ व एसटीस्थानक, पापय्या तालिम आदी मिळकतींचा निवडा तांत्रिक त्रुटीसाठी प्रलंबित आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा

**सोलापूर** : जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत चालू आर्थिक वर्षात प्राप्त निधी विहित वेळेत खर्च करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दल्या. नियोजन भवन येथे आयोजित जिल्हा वार्षिक योजनेच्या आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

या बैठकीत जिल्हा परिषद प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे यांच्यासह विविध खातेप्रमुख उपस्थित होते. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात प्रस्तावित कामांच्या १०० टक्के प्रशासकीय मान्यता झाल्या आहेत. त्यामुळे संबंधित सर्व यंत्रणांनी विहित वेळेत निधी खर्च करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या. कार्यान्वयन यंत्रणांनी त्यांच्या स्तरावर राबविण्यात येत असलेल्या योजनांची सद्यस्थिती व मार्च २०२३ अखेर निधी खर्च होण्यासाठी केलेली पूर्वतयारी यांची माहिती दिली. नियोजन समितीच्या जानेवारी महिन्यात पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उपस्थित मुद्यांच्या अनुपालन अहवालावर चर्चा करण्यात आली.

## ३ लाख ७५ हजारांचे दागिने पळवले

सुराज्य/सोलापूर

नातेवाईकांच्या घरी राहण्यात आलेल्या साताऱ्यातील एका महिलेचे ३ लाख ७५ हजार रुपयांचे दागिने चोरीस गेले. ही घटना पिलीव (ता.माळशिरस) येथील कुसमोड पाटील जवळ घडली.

या संदर्भात अरुणा संजय झणझणे (वय ५३ रा.चंदननगर, सातारा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे माळशिरसच्या पोलिसांनी अनिता बाळासाहेब ताकवले (रा. कुसुमोड पाटी, पिलीव) हिच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अरुणा झणझणे या २४ फेब्रुवारी रोजी पिलीव येथे नातेवाईकाच्या घरी आल्या होत्या.



दुसऱ्या दिवशी त्या गावी परत गेल्या. तेव्हा त्यांना पिशवीतील दागिने चोरीस गेल्याचे दिसून आले. त्याप्रमाणे त्यांनी पोलिसात तक्रार दिली. हवालदार मिसाळ पुढील तपास करीत आहेत.

# स्मार्ट सिटीच्या स्काडा प्रणालीचे काम झाले ९० टक्के पूर्ण

सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी योजनेंतर्गत सोलापूर शहरातील पाणीपुरवठ्यावर नियंत्रण ठेवून तो सुरळीत व्हावा या उद्देशातून करण्यात येत असलेल्या स्काडा प्रणालीचे काम ९० टक्के पूर्ण झाले आहे, अशी माहिती स्मार्ट सिटी कंपनीचे मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.



स्काडा या प्रणालीसंदर्भात विविध कामे १० फेब्रुवारीपासून हाती घेण्यात आले होते. हे काम २५ दिवसांत पूर्ण करावयाचे नियोजन आहे. या कालावधींदरम्यान अनेक वेळा शटडाऊन घेण्यात येत असल्याने शहराचा पाणीपुरवठा तीनऐवजी चार दिवसाआड केला जात आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात लोकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. काम पूर्ण झाल्यानंतर ही गैरसोय दूर होईल. स्काडा प्रणालीचे आतापर्यंत ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. उजनी तसेच हिप्परगा लाईन येथील काम पूर्ण झाले आहे. ७ ठिकाणी फ्लोमीटर तसेच ५ ठिकाणी व्हॉल्व्ह बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे.

**शुक्रवारी शेवटचे शटडाऊन : चौबे**
सोरेगाव जलशुद्धीकरण केंद्राजवळ मुख्य काम सुरू आहे. शुक्रवाी या कामासंदर्भात शेवटचे शटडाऊन घेतले जाणार आहे. दरम्यान, २५ दिवसांचे काम संपण्यास आखणीन एक आठवडा बाकी आहे. मुदतीत हे काम पूर्ण होऊन शहराचा पाणीपुरवठा पूर्वीप्रमाणे होईल, असेही व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

# रोख मजुरी न दिल्यास विडी कामगार वर्षा बंगल्याला घेराव घालतील; आडम मास्तरांनी दिली इशारा

**सोलापूर** : सोलापूरमध्ये मागच्या दहा वर्षात विडी कामगारांची संख्या जवळपास २० हजाराने घटली आहे. या कामगारांचे जीवन उद्ध्वस्त झाले याची कसलीच चिंता कल्याणकारी सरकारला नाही. धूम्रपान कायद्यामुळे विडी उद्योगावर संक्रात आली आहे, कामगारांना जिवंतपणी फस्त करण्याचा हा केंद्र आणि राज्य सरकारचा डाव आहे.



विडी कामगारांना रोख मजुरी न दिल्यास मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्याला घेराव घालतील अशी सिंहगर्जना ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी केली. सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स संलग्न लाल बावटा विडी कामगार युनियन च्या वतीने ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर व सिटू चे राज्य महासचिव ॲड. एम.एच.शेख यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी विडी कामगारांच्या विविध प्रलंबित न्याय हक्काच्या मागण्यासह मोर्चा काढण्यात आला. पूनम गेट येथे मोर्चेचा समारोप होऊन त्याचे जाहीर सभेत रूपांतर झाले. विडी कामगार लाल झेंडे घेऊन गगनभेदी आवाजात मागण्यांच्या घोषणा देत मोर्चात हजारोंच्या संख्येने सामील झाले. कामगार नेत्या कॉ. नसीमा शेख यांच्या नेतृत्वाखाली मा.जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांना समक्ष भेटून निवेदन देण्यात आले. शिष्टमंडळात अँड.अनिल वासम विक्रम कलबुर्गी, सुनंदा बल्ला, शकुंतला पानिभाते, लिंगवा सोलापूरे आदींचा सहभाग होता.

कामगारांच्या किमान वेतनाची फाराकांसहीत अंमलबजावणी व्हावी व सुधारीत किमान वेतन जाहीर करावे,सिगारेट्स अंड अदर टोबको विधेयकाच्या सक्तीच्या अंमलबजावणी पासून विडी कामगारांना संरक्षण द्यावे, दर आठवड्याला रोख मजुरी द्यावी, विडी कामगारांना दरमहा पेन्शन ९००० मिळावी यासह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. मोर्चाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन अँड.अनिल वासम यांनी केले. मोर्चासाठी ,विल्यम ससाणे,वसीम मुल्ला,विक्रम कलबुर्गी, बापू साबळे, वीरेंद्र पद्मा, अशोक बल्ला, हसन शेख, अप्पाशा चांगले, रफिक काझी, राजू गेंट्याल, दीपक निकंबे, नागेश म्हैत्रे, बालाजी गुंडे, बाळकृष्ण मल्याळ, शाम आडम, मोहन कोक्कुल, दाऊद शेख, अकिल शेख, आसिफ पठाण, इलियास सिद्दीकी, दत्ता चव्हाण, अफसना बेग, मल्लेशम कारमपुरी मल्लिकार्जुन बेलीयार, गोपाळ जकलेर लक्ष्मीनारायण जोरीगल, सनी आमाटी आदींनी परिश्रम घेतले.

# शनिवारपासून संगीत प्रतिभा; बालगंधर्व संगीत महोत्सव

**सोलापूर** : येथील दुर्लभ सुंदरी वाद्य कला अकादमी सांस्कृतिक मंत्रालय भारत सरकार केंद्रीय संगीत नाटक अकादमी मल्हार डिजिटल रामेश्वर गुरव गीतांजली पेंट कंपनी व हॉटेल ऐश्वर्या यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक चार व पाच मार्च रोजी संगीत प्रतिभा महोत्सवाचे बालगंधर्व संगीत महोत्सव आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष पंडित भिमांना जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

४ मार्च रोजी सायंकाळी साडेपाच वाजता हिराचंद नेमचंद वाचनालय लोकमान्य टिळक सभागृह येथे महापालिका आयुक्त शितल तेली उगले व पोलिस आयुक्त राजेंद्र माने, नंदू भराडीया, शशिकांत पाटील, विजय साळुंखे प्रशांत बडवे आदींच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे शाश्वती चव्हाण, के रोहन नायडू, प्रीतमदास, आमिर खान, कृष्णदेव वाडीकर, युवराज सोनार सत्यजित करडीकर आदिना युवा गंधर्व पुरस्कार देण्यात येणार आहेत. रविवार दिनांक ५ मार्च रोजी सायंकाळी साडेनऊ वाजता सोलापूरचे कौस्तुभ, कनिष्का शिवपुजे यांचे शास्त्रीय गायन, नितीन दिवाकर तबला, ओंकार पाठक यांचे संवादिनी साथ भोपाळचे आमिर खान यांची राहणार आहे. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे. आला . कला रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन पंडित भिमण्णा जाधव यांनी यावेळी केले.

# अभिजित पाटील ठरले दोस्तीच्या दुनियेतील राजामाणूस

सुराज्य सोलापूर Impressive

सुराज्य/पंढरपूर

**मैत्री करणे, मैत्री जपणे आणि मित्रासाठी वाट्टेल ते करणे या तीन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. फ्रेंड्शीप डेला मित्र प्रेम ओसंडून वाहते. पण मित्राच्या गरजेला धावून जात आपण मैत्रीच्या दुनियेतील खरा राजा माणूस असल्याचे विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजित पाटील यांनी दाखवून दिले आहे.**

## आजारी मित्राला केले मुंबईला विमान ॲम्ब्युलन्सने रवाना

विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांचे जळोली गावचे सहकारी मित्र व विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक दत्तात्रय नरसाळे यांना मागील चार पाच दिवसांपासून पोटदुखीचा त्रास होत असल्यामुळे सोलापूर येथील आश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे उपचारांसाठी विमान ॲम्ब्युलन्सने हालवण्यात आले आहे. नरसाळे यांना चार पाच दिवसांपासून पोटदुखीचा त्रास जाणवत होता. पंढरपूर येथील बोरावके हॉस्पिटलमध्ये २ दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना सोलापूर येथील आश्विनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. पोटदुखी आजारामुळे काही शस्त्रक्रियेनंतर त्यांची तब्येत खालावली होती. पोटात आतड्यात इन्फेक्शन जास्त असल्यामुळे ऑपरेशन केले होते. गेली दोन दिवस अभिजीत पाटील हे मुंबई येथे ठाण मांडून असताना मोठ-मोठ्या हॉस्पिटलमध्ये अनेक डॉक्टरांचे सल्ले घेत होते डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्यांनी सोलापूर अश्विनी हॉस्पिटल येथून आज दुपारी ४वा ॲम्ब्युलन्स विमानाने आपल्या मित्राला स्वतः अभिजीत पाटील हे येऊन आपल्या मित्राला मुंबई येथे दाखल केले. पोटातील आतड्याच्या ऑपरेशनमुळे ट्रांसप्लान्ट करणे गरजेचे होते त्यासाठी अभिजित पाटील यांनी हैद्राबाद, मुंबई, पुणे याठिकाणी चौकशी सुरू असताना मुंबई येथील ग्लोबल हॉस्पिटल येथे दाखल करण्यासाठी आज अभिजित पाटील यांनी एअर ॲम्ब्युलन्स चो सोय करून स्वतः अभिजित पाटील हे मित्राला सोलापूर येथून दत्तात्रय नरसाळे यांना उपचारासाठी एअरलिफ्ट ॲम्ब्युलन्स केले.



**सहकाऱ्याला एकटे सोडणे योग्य नाही : पाटील**
सोबत काम करणारा सहकारी त्याच्यावर संकट असताना मी एकटा सोडणं योग्य नाही, त्यांना लवकरात लवकर उपचार सुरू करणे आणि लवकर आजारातून मुक्त करणे माझी जबाबदारी आहे. मुंबई येथील विविध हॉस्पिटल आणि डॉक्टर्स सोबत चर्चा करून चांगल्या सुख सुविधा व अधिक टेक्नॉलॉजीमुळे मुंबई येथे ग्लोबल हॉस्पिटल येथे हलवण्यात आले आहे. मी स्वतः त्यांच्या सोबत आहे, ते लवकर आजारातून होऊन बरे होतील, असे अभिजित पाटील यांनी सांगितले.

